शुक्रवार, ३० डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 30 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-133 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-08 • PRICE-5

चर्चेतली बातमी

## शिवसेना भवनाच्या ताब्यावर पूर्णविराम

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मुंबई महापालिकेतील शिवसेनेचं कार्यालय ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर आता शिंदे गटाकडून शिवसेना भवन ताब्यात घेण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. एका बापाचे असतील तर येऊनच दाखवा, असे आव्हानच ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केलं आहे. तर शिंदे गटाचे प्रवक्ते भरतशेठ गोगावले यांनी शिवसेना भवन ताब्यात घेण्याचे आमच्या डोक्यात नाही. आमचा तसा प्रयत्नही नसल्याचे सांगून या वादाला पूर्णविराम दिला आहे. दादरचे शिवसेना भवन ताब्यात घेण्याचे आमच्या डोक्यात नाही. विचारात नाही आणि मनातही नाही. आम्ही कधी तो विषयही काढला नाही. आमच्या बैठकीत ठरले की दुसरे कार्यालय तयार करायचे. आमच्या बैठकीत कधी शिवसेना भवनचा विषय निघत नाही. आम्ही कधीच त्यावर ब्र शब्दही काढला नाही. आमच्या कुणाच्या तोंडून शिवसेना भवनावर दावा करण्याचे विधान निघाले असेल तर सांगा, असे आव्हानच भरतशेठ गोगावले यांनी दिले. आमच्या बापांमध्ये हिंमत होती म्हणून आम्ही तयार झालो. आमच्या बापांपर्यंत जाऊ नका. खऱ्या बापाचे होतो म्हणून तुम्हाला हिसका दाखवला. आमच्या नादी कुणी लागू नका. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नाद तर कोणी करायचाच नाही, असा इशारा गोगावले यांनी दिला.

# पीएफआयवर पुन्हा छापेमारी

## केरळमध्ये पहाटेच तब्बल ५६ ठिकाणी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा ठपका ठेवत केंद्र सरकारने 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' (पीएफआय) या संघटनेवर पाच वर्षांची बंदी घातली आहे. ही कारवाई सप्टेंबरमध्ये करण्यात आली होती. मात्र त्यानंतर आता पुन्हा एकदा पीएफआय राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या(एनआयए) रडारावर आल्याचे दिसत आहे.**

कारण, एनआयएने आज(गुरुवार) पहाटेच केरळमधील पीएफआयशी संबधित असणाऱ्या तब्बल ५६ ठिकाणांवर छापेमारी केल्याचे समोर आले आहे. सुत्रांच्या हवाल्याने एएनआय वृत्तसंस्थेने ही माहिती दिली आहे. केंद्र सरकारने पीएफआयवर बंदी घातल्यानंतर या संघटनेतील दुसऱ्या फळीतील नेते वेगळ्या नावाने पीएफआयचे काम करत असल्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई केली गेल्याचे समोर आले आहे. स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) आणि जमात-उल-मुजाहिद्दीन बांगलादेश (जेएमबी) या बंदी घातलेल्या संघटनांचे सदस्य 'पीएफआय'चे संस्थापक आहेत. आयसिससारख्या जागतिक दहशतवादी संघटनांशी 'पीएफआय'चे धागेदोरे आढळून आले आहेत. एका समाजाच्या धार्मिक भावना भडकवून त्यांना दहशतवादी संघटनांमध्ये सामील केले जात होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन 'पीएफआय' आणि अन्य संघटनांवर बंदी घालण्यात येत आहे,' असे केंद्र सरकारने जारी केलेल्या निवदेनात म्हटले होते.




# परमपूज्य



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक, परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि परमपूज्य गोलवलकर गुरुजी यांच्या रेशिमबाग, नागपूर येथील स्मृतीस्थळास गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अभिवादन केले.

# तुमच्यासाठी हा कठीण काळ

## पवारांचे मोदींना भावनिक पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन यांची प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना बुधवारी अहमदाबाद येथील यू. एन. मेहता इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओलॉजी अँड रिसर्च सेंटर या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांनतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेऊन तब्येतीची विचारपूस केली तसेच डॉक्टरांशी चर्चा केली होती. हिराबेन यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टारांनी सांगितले आहे. हिराबेन यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा व्हावी यासाठी देशभरातून प्रार्थना करण्यात येत आहे. अनेक राजकीय नेत्यांनी ट्विट आणि पत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदींना हिराबेन यांच्या प्रकृतीबद्दल काळजी व्यक्त करत दिलासा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी देखील पत्राच्या माध्यमातून काळजी व्यक्त केली. शरद पवार पत्रात म्हणाले की, काल तुम्ही अहमदाबाद मधील हॉस्पिटलमध्ये जाऊन आईच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे आणि त्यात सुधारणा होत असल्याचे समजल्यानंतर मला बरं वाटलं. मला माहितीये तुमचे आणि आईचे संबंध फार जवळचे आहेत. तुमच्यासाठी हा कठीण काळ आहे, याची देखील मला जाणीव आहे. आई ही या जगातील सर्वात पवित्र अशी गोष्ट आहे. तुमच्या आयुष्याला आकार देण्याचे आणि उर्जेचा एक अखंड स्त्रोत बनण्याचे काम तुमच्या आईने केले. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होवो, अशी सदिच्छा व्यक्त करतो. आपल्याला नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

हिराबेन मोदी यांची प्रकृती खालावल्यानंतर देशभरातून अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी काळजी व्यक्त केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेते राहुल गांधी, सरचिटणीस प्रियंका गांधी वाडरा यांनी बुधवारी हिराबेन मोदी यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच त्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केली. मोदी यांच्या मोठ्या बंधूंकडून आईच्या तब्येतीबाबत महत्त्वाची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मोठे भाऊ सोमाभाई मोदी यांनी थोड्याच वेळापुर्वी हिराबेन मोदी यांच्या तब्येतीबद्दल पीटीआय वृत्तसंस्थेला माहिती देताना सांगितले, आईची तब्येतीमध्ये हळूहळू सुधारणा होत आहे. सध्या सकाळपासून त्या लिक्विड डाएटवर आहेत. त्या आता हाता-पायाची हालचाल देखील करत आहेत. एवढेच नाही तर त्यांनी हातवारे करुन मला उठवून बसा असेही सांगितले. हॉस्पिटलमधून सुट्टी देण्याबाबतचा निर्णय तपासण्या केल्यानंतर डॉक्टर घेतील.

# गायरान जमीन वाटप प्रकरणी विद्यमान मंत्र्यांची चौकशी करा

## अजित पवार : चौकशी होईपर्यंत मंत्रीपदाचा राजीनामा घ्या


आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : तत्कालीन महसूल राज्यमंत्री आणि विद्यमान कृषीमंत्री यांनी गायरान जमीन नियमबाह्य पद्धतीने वाटप केली असून यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याने विद्यमान मंत्र्यांची सखोल चौकशी करा आणि चौकशी होईपर्यंत मंत्री पदाचा राजीनामा घ्या अशी जोरदार मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज स्थगन प्रस्तावाद्वारे केली. तत्कालिन महसूल राज्यमंत्री यांनी २९ जुलै २०१९ रोजी वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर सावरगाव येथील गायरान जमीन खाजगी व्यक्तीला वाटप केल्याची बाब उघड झाली आहे. सातत्याने या घटना घडत आहेत. ज्यावेळी मंत्री पदाची शपथ घेऊन मंत्री कामाला सुरुवात करतात त्यावेळी या घटना घडणे योग्य नाही असेही अजित पवार म्हणाले.

गायरान जमीनीबाबत वेगळ्या प्रकारचे आदेश असताना पण या जमीनीचे वाटप करण्यात आले आहे. शांताबाई जाधव यांच्या अर्जावर वाशिम जिल्हाधिकारी यांनी १७ मे २०१८ रोजी दिलेला आदेश तत्कालीन महसूल राज्यमंत्र्यांनी रद्द केला. जिल्हाधिकारी यांनी वस्तुस्थिती तपासली नाही असा चुकीचा अभिप्राय दिला गेला आहे. एक महिन्याच्या आत पाच एकर जागा नियमित करावी असे लेखी आदेश दिले आहेत. हे नियमाला धरुन नाही. नियमबाह्य जमीनीचे वाटप झाले आहे. कदाचित आर्थिक व्यवहार झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही असा थेट आरोपही अजित पवार यांनी केला. अशी प्रकरणे सातत्याने समोर येत असून या सर्वप्रकरणी महसूल राज्यमंत्र्यांनी दलालांमार्फत संधान साधून जमीन वाटपाची कारवाई केली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही या सर्व प्रकरणातील कागदपत्रे माझ्याकडे आहेत असेही अजित पवार यांनी सांगितले.

या जमीनी प्रकरणी वेगवेगळ्या ऑर्डर निघाल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून चौकशी होईपर्यंत सबंधित मंत्र्यांना राजीनामा द्यायला लावला पाहिजे त्यांनी सरकारमध्ये मंत्री म्हणून राहू नये अशी मागणीही अजित पवार यांनी केली.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

एटीएम कार्ड सुविधा देत नाहीत. कोणीतरी एखाद्या सेवानिवृत्त व्यक्तीच्या नातेवाईकांनी त्याचा गैरवापर केला असेल, म्हणून सर्वांनांच त्या सुविधेपासून वंचित ठेवले जाते. कारण विचारले तर वरून ट्रेझरीकडूनच आदेश आहेत की एटीएम कार्ड देऊ नका असे सांगितले जाते. बिचाऱ्या पेन्शनरांना रांगेत पैसे काढण्यासाठी उभे राहावे लागते. त्यातही गंमत अशी की पैसे काढण्याची स्लीप चालत नाही, त्यासाठी चेक द्यावा लागतो. दोष कदाचित त्या कर्मचाऱ्यांचा नसेलही. वरून आलेल्या आदेशाचे ते पालन करतात पण त्रास होतो तो मात्र ज्येष्ठ नागरिकांना. एखादी सेवानिवृत्त व्यक्ती जर निवृत्तीनंतर आपल्या मुलामुलीकडे इतर जिल्ह्यात राहायला गेली तर तिकडे पेन्शन लवकर ट्रान्स्फर होत नाही. आजच्या या सगळ्या ऑनलाईनच्या जमान्यात हा सगळा केवढा अन्याय ! आता भाषेच्या वापरातील काही गमतीजमती पाहू. आमचे एक सहकारी बोलताना नेहमी ' मला काय म्हणायचं आहे ' असं म्हणत. मी मनातल्या मनात म्हणायचो, '

## ' तेच ते ... '



आता तुम्हीच बोलताय आणि पुन्हा मला काय म्हणायचं कशाला ! ' तर काही मंडळी बोलत असताना ' खरं सांगू का ? ' असं विचारतात. आता समोरची व्यक्ती तुमच्याकडून ' खरे बोलण्याचीच ' अपेक्षा करत असते हे यांना कोण सांगणार ! आणखी काही व्यक्तींना ते बोलत असताना समोरच्यालाच ' काय झालं माहिती आहे का ' असं विचारण्याची सवय असते. आता त्या समोरच्या व्यक्तीला कसं काय माहिती असेल की तुमच्याकडे काय झालं असेल ते ! इंग्रजी आणि मराठी भाषेच्या गमतीदार मिश्रणातून तयार होणारे विनोद तर मजेदार असतात. आमचे एक सहकारी त्यांना काही त्रास झाला की ' डोक्याला नसता हेडेक ( ? ) म्हणायचे. आता हेडेक डोक्यालाच होणार ना ! डोक्याला हेडेक म्हणणे म्हणजे पोटाला स्टमकेक, पाठीला बॅकेक असे म्हणण्यासारखे आहे. असे ' एकेक ' काय सांगावे ! सकाळचे ' मॉर्निंग वॉक ' हा ही असाच एक प्रकार. एकदा तर एक गंमत घडली. माझा एक थोडा कमी शिकलेला मित्र आपले वजन वाढल्यामुळे डॉक्टरकडे गेला. डॉक्टरांनी त्याला विचारले, ' तुम्ही मॉर्निंग वॉक ' घेता का ? तेव्हा तो म्हणाला, ' सकाळी मला जमत नाही पण मी संध्याकाळी मॉर्निंग वॉकला जातो. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# घराची उपयुक्तता व सौंदर्य दोन्हीही महत्वाचे

आधुनिक केसरी

“घर” या शब्दाला लावलेल्या “आपलं” या विशेषणातच घराबरोबरच्या आपल्या असलेल्या नात्याची वीण किती घट्ट असते ते केवळ दिसून येतं असं नव्हे तर तशी ती आपण अनुभवत असतो. आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारं, मानसिक आधार देणारं, अंतर्मनाला धीर देणारं, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारं, सामजिक पत निर्माण करणारं, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारं, कौटुंबिक एकोपा टिकवणारं, आपली नातीगोती जपणारं, उणीवा दूर करणारं, आपल्या जाणीवा जपणारं, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारं, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारं आपलं हक्काचं ठिकाण हे दुसरं-तिसरं कोणतंही नसून आपलं स्वतःचं घरच असतं. आणि घर देखील कसं असतं तर, “शोध घेतला दशदिशा, पूर्ण झाली मनीषा” अगदी असंच, आपल्या अंतर्मनातली इच्छा पूर्ण करेल असं. गृह सजावट म्हणजे एकप्रकारे आपल्या मालमत्तेचं शास्त्रीय व्यवस्थापन असतं. त्यामुळे या कामाची सुरुवात देखील शास्त्रोक्त पध्दतीनं होणं जरूरीचं असतं. या कामासाठी वापराव्या लागणाऱ्या सर्व शास्त्रात मानसशास्त्र महत्वाचं असतं. सौदर्याची प्रचिती तेव्हाच प्राप्त होत असते जेव्हा आपण केलेल्या गृह सजावटीच्या कामाची आपल्या अंतर्मनाला अनुभूती येते. गृहसजावटीसाठी उपयुक्तता आणि सौंदर्य यांची सांगड घालून संरचना करणं अपेक्षित असतं. आपल्या घराचं अंतरंग सजवण्यासाठी सर्व प्रथम आपल्या अंतर्मनातील सौदर्याचा अभ्यासपूर्वक विचार केलेला असणं जरुरीचं असतं. गृहसजावटीच्या कामात निवडल्या जाणाऱ्या प्रत्येक वस्तूंचा उपयुक्तता आणि सौंदर्य या दोन्हीही दृष्टिकोनातून विचार केला जाण्याची आवश्यकता असते. एकाच घरात, एकाच कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या आवडी निवडी निरनिराळ्या असतात. स्वाभाविकच त्यांच्या गृहसजावटीच्या संकल्पना देखील भिन्न असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### सांगू नये कधी

सांगू नये कधी | दुःख अंतरीचे ||
भोग संचिताचे || खेळ सारे||१||
जाणतो सगुण | देव पाषाणाचा ||
भाव जो आत्म्याचा | एक व्हावा||२||
भेटला जयासी | सखा तो श्रीकृष्ण ||
होतोच अर्जुन | समाधानी|| ३||
मिळेना जोवरी | संगती सज्जन ||
दुर्दैवी तो जाण | नरजन्म||४||
मौनातच कळे | मर्म जीवनाचे ||
ऊन-सावलीचे | मृगजळ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## संत बंका अभंगवाणी

आधुनिक केसरी

‘चोखा चोखट निर्मळ। तया अंगी नाही मळ।।
चोखा प्रेमाचा सागर। चोखा भक्तीचा आगर।।
चोखा प्रेमाची माउली। चोखा कृपेची साऊली।।
चोखा मनाचे मोहन। बंका घाली लोटांगण।।

## ।। दासबोध स्तवन ।।



# द्वैतकल्पनानिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माणसाचे मन चंचल असते ते संकल्पही करते व विकल्पही करते. संकल्प म्हणजे काय? मन जेव्हां ब्रम्हाची कल्पना करते तेव्हा ती खरी असते तिला संकल्प म्हणतात. विकल्प म्हणजे काय? मन जेव्हा मायेची कल्पना करते तेव्हा ती खोटी असते तिला विकल्प म्हणतात. ब्रम्ह&माया,संकल्प&विकल्प या दोन्हींचा म्हणून ळ मन चंचल असल्याने बसत नाही. मनाचा मी पणा केव्हा गळून पडतो साक्षीपणा, चैतन्य,सत्ता हे गुण माया ब्रम्हाच्या माथी मारते. ब्रम्हावर या गुणांचा आरोप करते. घटाकाश-- भांड्याच्या आकाराचे आकाश. मठाकाश-घरातील आकाश. महदाकाश- -म्हणजे विश्वातील आकाश असे तीन भेद आहेत. त्याच प्रमाणे माया खरी मानली म्हणजे ब्रम्हावर आरोप गुणांचा करतात.मूळ ब्रम्हामध्ये ते गुण नाहीत. पण जोपर्यंत मायेचे खरेपण वाटते तोपर्यंत ब्रम्हाला साक्षित्व असते. "मी साक्षी पणाने पहातो" असे द्वैत असते. पण माया,अविद्या दोन्हींचा निरास झाला म्हणजे द्वैतही नाहीसे होते. साक्षीत्वपण नाहीसे होते. मन व्यापक बनता बनता सर्व साक्षी बनते. ते जेव्हा उन्मन होते तेव्हा तुर्यावस्था मावळते. "मी देह आहे "हा अहंभाव नाहीसा होतो.

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**अहंकार विस्तारला या देह्याचा।**
**स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा।**
**बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावीं।**
**सदा संगती सज्जनाची धरावी।।१६६।।**

**श्लोकार्थ :-** देहाच्या मीपणाचा विस्तार होऊन स्त्री, पुत्र, मित्र इ. व्यक्तींमध्ये मन गुंतून राहते. पण अज्ञानामुळे झालेला हा गैरसमज आहे. तो अभ्यासाने नाहीसा करावा म्हणजे पुनः पुनः जन्मास येण्याची कटकट नाहीशी होईल. पण हे साधण्यासाठी आत्मबुद्धि स्थिरावलेल्या पुरुषाची नित्य संगत करावी.

**विवेचन :-** समर्थांनी मागील श्लोकात मनुष्याचा अहंकार परमार्थ मार्गातील मोठा अडथळा आहे असे सांगितले आणि मुक्तीला आपली नवरी समजून ती प्राप्त होण्यासाठीच प्रयत्न करीत राहावे असेही सांगितले. या श्लोकात मनुष्य अहंकार, देहबुद्धी आणि आपले गणगोत यामध्ये कसा फसत असतो याचे वर्णन केलेले आहे. देह म्हणजे ‘मी’ या अहंकारामध्ये मी स्वतः तर आहेच, शिवाय मागील श्लोकाचा अर्थ स्पष्ट करताना सांगितल्याप्रमाणे मी ज्यांना माझे म्हणतो ते सारे,म्हणजे माझे आईवडील, पत्नी, अपत्ये, आप्त, मित्र अशा अनेकांचा त्यात समावेश आहे. या साऱ्या गोतावळ्याबद्दल मनामध्ये प्रेम, लोभ, माया, ममता या मोहाच्या भावना असतातच. समर्थ सांगतात मनुष्यामधील मीपणाची, अहंकाराची व्याप वाढवू तितकी वाढत जाते.

एक विचार मनात आला. मनुष्याचा पहिला पगार आजच्या मानाने कमीच असतो, परंतु तो सुध्दा पुरतो आणि आजही मिळणारा पगार ही पुरतोच..... थोडक्यात, प्रपंच छोटा असो वा मोठा, श्रीमंत असो बा गरीब, आत्मघात करायला पुरेसा ठरतो..... सर्वसामान्य मनुष्याचा किराणा मालाचा खर्च साधारण ५०००/- असेल आणि त्याचे इतर खर्च त्यापेक्षा खूपच जास्त असतील, बघा पटतंय का ? मूलभूत गरजांची किंमत कमी असते परंतु वाढविलेले व्याप पोसण्याची किंमत जास्त मात्र नेहमीच जास्त असते. ते व्यापच मनुष्याचे जीवन दुःखी करीत असतात. सध्याची जीवनशैली मनुष्याला अधिकाधिक मोहात पाडणारी आहे असे म्हणता येईल.

पण हा मोह म्हणजे काय आहे ? प्रपंच हा काही खरा नाही, तर खरा कोण आहे तर एकमेव भगवंत. आजपर्यंत आपले अनेक जन्म होऊन गेले, त्या त्या जन्मात आपले अनेक जण बाप झाले, आई झाले, अनेक वेळा आपण संपत्ती गोळा केली, उपभोगली.... या सर्व केवळ एक भ्रामक कल्पना आहेत असे सर्व संत सांगतात. बालपणी आईवडिलांविषयी कृतज्ञतेची भावना असते. तिची जागा हळू हळू कमी होत जाते आणि मनुष्य पत्नीवरच्या प्रेमाला प्राधान्य देऊ लागतो कारण ती आपल्या साऱ्या गरजा पुरवते. मुले झाली म्हणजे त्यांच्याकडे जास्त लक्ष केंद्रित केले जाते कारण आपल्या म्हातारपणात त्यांनी आपल्याला आधार द्यावा अशी अपेक्षा असते. या सगळ्यांवरच्या मोहामध्ये आपल्या त्यांच्यापासूनच्या अपेक्षाही दडलेल्या असतात. ज्या कधी पुऱ्या होतात, कधी होत नाहीt. निश्चिती कशाचीच नाही. अपेक्षा पुऱ्या झाल्या तर उत्तम, न झाल्या तर अपेक्षाभंगाचे दुःख मनुष्याला मरेपर्यंत सहन करावे लागते. या मोहाला भुलून मनुष्याच्या हाती उरते काय तर एक मोठे शून्य...! भ्रामक कल्पनांपोटीच जन्मभर आपण या सर्व गोतावळ्याची चिंता वाहिली, हे सत्य कळून येते. त्यापेक्षा मनुष्याने जिवंत आहे तेव्हाच, खंबीरपणे त्या भ्रमाला दूर का करू नये ? ममत्व सोडून का जगू नये ? असे समर्थ सुचवतात. ज्याला प्रपंचाचे ममत्व सोडता येईल तो खरा धीट म्हणता येईल. ज्याला आपल्या आप्त स्वकियांबद्दलचे ममत्व सोडता येत नाही, त्याच्यासाठी आणखी एक उपाय आहे. तो म्हणजे ते ममत्व भगवंताकडे वळविणे. आपल्याला मिळालेले भौतिक सुख भगवंताच्या इच्छेने प्राप्त झाले आहे अशी दृढ समजूत झाली पाहिजे. म्हणजे ममत्व सोडणे सोपे जाते.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# लाकूडतोड्या आणि देवदूत

आधुनिक केसरी

एक गाव होते त्या गावांमध्ये एक लाकूडतोड्या राहत असे तो लाकूडतोड्या रोज नदीकाठी असलेल्या एका झाडावर चढून एक लाकूडतोड्या लाकडे तोडत असतो. एक दिवस काय झाले लाकूडतोड्या नदीकाठी एका झाडावर चढून लाकडे तोडत असताना अचानक त्याची कुऱ्हाड नदीत पडते. नदी खोल असल्यामुळे त्याला नदीत जाऊन ती कुऱ्हाड काढता येत नव्हती. तो दुःखीहोऊन रडू लागतो. हे पाहून नदीतून एक देवदूत येतो. तो त्याला म्हणतो की, काळजी करू नकोस. मी तुला तुझी कुऱ्हाड काढून देतो. तो देवदूत नदीत डुबकी मारतो व सोन्याची कुऱ्हाड काढतो व म्हणतो ही का तुझी कुऱ्हाड? लाकूडतोड्या म्हणतो, नाही ही माझी कुऱ्हाड नाही.. देवदूत पुन्हा नदीत डुबकी मारतो व चांदीची कुऱ्हाड काढतो व म्हणतो ही का तुझी कुऱ्हाड? लाकुडतोड्या म्हणतो नाही. मग तो देवदुत लोखंडाची कुऱ्हाड काढतो. लाकूडतोड्या आता मात्र हीच माझी कुऱ्हाड असल्याचे सांगतो. कुऱ्हाड परत मिळाल्याने आनंदी होतो. लाकूडतोड्याचा प्रामाणिकपणा पाहून देवदूत लाकूडतोड्यावर प्रसन्न होतो. त्याला सोन्याची व चांदीची अशा दोन्ही कुऱ्हाडी बक्षीस म्हणून देतो. **तात्पर्य:** नेहमी प्रामाणिक राहावे कारण प्रामाणिकपणाचे फळ नक्कीच एक दिवशी मिळते.

# राहुल गांधींकडून ११३ वेळा सुरक्षा नियमांचे उल्लंघन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारत जोडो' यात्रेत सुरक्षेचा भंग झाला असून हलगर्जीपणामुळे राहुल गांधींच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे योग्य सुरक्षाव्यवस्था पुरवली जावी, अशी मागणी करणारे पत्र पक्षाचे संघटना महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पाठवले होते. यावर केंद्रीय राखीव पोलीस दलाने(सीआरपीएफ) उत्तर दिले आहे. काँग्रेसच्या आरोपावर सीआरपीएफने उत्तर देताना सांगितले की, काँग्रेस नेते राहुल गांधींनी अनेकदा विहित मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले आहे. राहुल गांधी यांनी २०२० पासून ११३ वेळा सुरक्षा नियमांचे उल्लंघन केले आहे. असे भारत जोडो यात्रेदरम्यानही घडले आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार काँग्रेसने गृहमंत्रालयास पाठवलेल्या पत्राचे उत्तर देताना सीआरपीएफने सांगितले की, निर्धारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार संपूर्ण व्यवस्था करण्यात आलेली आहे. तर, अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुरक्षाप्राप्त व्यक्तीसाठी सुरक्षा तोपर्यंत राहते, जोपर्यंत तो व्यक्ती सुरक्षा नियमांचे पालन करतो. २०२० नंतर राहुल गांधींद्वारे सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्वांचे ११३ वेळा उल्लंघन झाले आहे. याशिवाय सरकारी अधिकाऱ्यांनी आरोप केला की, भारत जोडो यात्रेच्या दिल्ली टप्प्यातही राहुल गांधीं सुरक्षा नियमांचे उल्लघंन करत आहेत. राहुल गांधींना झेड प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आली असून यात्रेमध्ये सुरक्षेचा भाग म्हणून त्यांच्याभोवती पोलिसांची साखळी उभी केलेली असते. त्यामुळे कितीही गर्दी झाली तरी हे सुरक्षा कडे तोडून लोक राहुल गांधींच्या जवळ जाऊ शकत नाहीत. 'भारत जोडो' यात्रेने दिल्लीत प्रवेश केल्यानंतर, लोकांची अलोट गर्दी झाली होती. यात्रा लालकिल्ल्याकडे निघाली असताना पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली होती. त्यांनी राहुल गांधींभोवती सुरक्षा साखळी उभी केली नाही. गर्दी अस्ताव्यस्त झाली, धक्काबुक्की झाली, लोक खाली पडले. पोलिसांनी लोकांना नियंत्रित करण्यासाठी काही केले नाही, असा दावा प्रवक्ता पवन खेरा यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. अमित शहा यांना पाठवलेल्या पत्रामध्येही दिल्ली पोलिसांच्या निष्क्रियतेबद्दल तक्रार करण्यात आली आहे. 'भारत जोडो' यात्रेचा पुढील प्रवास पंजाब आणि जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील राज्यांमधून होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने राहुल गांधी व अन्य यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलावीत अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आली आहे.



# पुण्यातील कोयता गँगची दहशत थांबेना!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असणाऱ्या सिंहगड लॉ कॉलेज परिसरात दोन तरुणांनी हातात कोयते घेऊन दहशत निर्माण करण्याचा धक्कादायक प्रकार आता समोर आला आहे.
पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असणाऱ्या सिंहगड लॉ कॉलेज परिसरात दोन तरुणांनी हातात कोयते घेऊन दहशत निर्माण करण्याचा धक्कादायक प्रकार आता समोर आला आहे. गेल्या काही दिवसांपासून कोयता बाळगून मध्यवर्ती भागात दहशत निर्माण करण्याचे कृत्य सर्रास सुरु असल्याचं समोर आलं आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. सिंहगड लॉ कॉलेज रोडवर दोन तरुणांनी हातात चाकू सुरे घेऊन परिसरातील दुकानांमध्ये जाऊन अनेक लोकांना भोसकले. रस्त्यात जो दिसेल त्याला चाकू दाखवून भीती दाखवली जात असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या हल्ल्यात एक जण जखमी देखील झाला आहे. जखमी झालेल्या तरुणाला हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेची माहिती मिळताच सिंहगड रोड पोलिसांनी या दोघांना पाठलाग करुन पकडले, मात्र यातील एकाने पळ काढला. एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तो अल्पवयीन असल्याचे समजते दुसऱ्या आरोपीचे नाव करण दळवी असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कोयता गँगचा धुमाकूळ दोन दिवसांपूर्वी गँगने पुणे जिल्ह्यातील वेळू ग्रामपंचायत हद्दीतील श्रीराम पेट्रोल पंपावर दरोडा टाकला होता. चोरांनी कोयत्याने मारहाण करुन 22 हजार रुपयांची रोख रक्कम लुटली होती. शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. शुक्रवारी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पाच अज्ञात व्यक्ती हातात दोन ते अडीच फूट लांबीचे धारदार कोयते घेऊन दोन काळ्या रंगाच्या मोटरसायकलवरुन आले होते. त्यांनी सिक्युरिटी गार्डच्या हाताला पकडून कार्यालयात आणून रोख रकमेची मागणी केली होती.

# कोळशाचे प्रदूषण शेतकऱ्यांच्या जीवावर, यवतमाळमध्ये नुकसान

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** जिल्ह्यातील वणी परिसरात दिवसरात्र होत कोळशाची वाहतूक सुरु आहे. यामुळं परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या कोळशाच्या प्रदुषणाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. कारण या कोळशाच्या प्रदुषणामुळं शेती पिकांचे मोठं नुकसान होत आहे. त्यामुळं शेतकऱ्यांवर आर्थिक संकट आलं आहे. सोयाबीन, तूर आणि कापूस या पिकांच्या उत्पन्नात घट प्रदूषणामुळु रस्त्यालगत असलेल्या शेतातील पिकांची उत्पादकात कमी होऊन आर्थिक नुकसान होत आहे. टिप्पर आणि ट्रॅकमधून कोळशाची वाहतूक ती झाकून नेणं गरजेचं आहे. तसेच या मार्गावर पाणी टाकणं गरजेचे आहे. मात्र, या कुठल्याच नियमांची अंमलबजावणी होत नसल्यानं रोड लगत असलेल्या शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहेत. सोयाबीन, तूर आणि कापूस या उत्पन्नात घट येत आहे. पिकांवरील पानावर अक्षरशा धुळीचा थर सासलेला आढळून येत आहे.
वणी परिसरात उकणी, मुंगोली, घोंसा, कुंभारखणी, नायगाव, निलजइ, जुनाड, पिंपळगाव, कोल्हार पिंपरी, भांदेवाडा अशा दहा कोळसा खाणी आहे. तर परिसरात 22 गिट्टी क्रॅशर आहेत. या ठिकाणी शासनाचे सर्व नियम धाब्यावर ठेऊन रात्रंदिवस कोळशाची वाहतूक सुरू राहते. त्यामुळं त्यातून धूळ बाहेर पडते. परिणामी यांचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, त्याची दखल घेतली नाही. एकंदरीत या धुळीमुळं वणी परिसरातील शेतीपिकांची उत्पादन क्षमता कमी झाली आहे. प्रशासनाने या गंभीर मुद्याकडे लक्ष द्यावं, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या वणी परिसरात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती आहे. वणीत कोळसा खाणी असल्यानं मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. रहदारी आणि कोळसा वाहतुकीमुळं प्रदूषण होत आहे. कोलडेपो चालकांनी कुठल्याही उपाययोजना केल्या नाहीत. रस्ते व्यवस्थीत नसल्यानं प्रदूषण होत आहे. ओव्हरलोड वाहतुकीवर कुठलीच कारवाई करण्यात येत नाही. अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे.

# कोल्हापूर विमानतळावरून 20 शहरांना कनेक्टिव्हिटी

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** इंडिगो एअरलाईन्सकडून कोल्हापूर विमानतळावरून जानेवारीपासून देशातील 20 महत्त्वाच्या शहरांसाठी कनेक्टिंग विमानसेवा सुरू होणार आहे. 12 जानेवारीपासून 20 महत्त्वाच्या शहरांसाठी कनेक्टिंग विमानसेवा सुरू होणार आहे. इंडिगो एअरलाईन्सकडून कोल्हापूर विमानतळावरून देशातील प्रमुख शहरांना जोडणारी विमानसेवा सुरू होणार आहे. त्यामुळे कोल्हापूर विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांना मोठी सुविधा उपलब्ध होईल तसेच उद्योग जगताला त्याचा लाभ होणार आहे. सध्या कोल्हापूर विमानतळावरून कोल्हापूर-अहमदाबाद, कोल्हापूर-हैदराबाद, कोल्हापूर-बंगळूर आणि कोल्हापूर-तिरूपती या 4 मार्गांवर थेट विमानसेवा इंडिगो एअरलाईन्सकडून नियमितपणे सुरु आहे. नववर्षात 13 जानेवारीपासून कोल्हापूर ते बंगळूर आणि पुढे कोईमतूर विमानसेवा सुरू होत आहे. त्याशिवाय कोल्हापूरपासून देशातील काही प्रमुख देशांसाठी कनेक्टींग फ्लाईट उपलब्ध आहेत. त्यानुसार भुवनेश्वर, चंदीगड, चेन्नई, कोईमतुर, दिल्ली, गुवाहाटी, इंदूर, जयपूर, कोची, कोलकत्ता, लखनौ, मंगळूर, मुंबई, तिरूअंनतपुरम, त्रिचीरापल्ली आणि विशाखापट्टणम या शहरांसाठी, इंडिगो एअरलाईन्सच्या कनेक्टींग फ्लाईटस् प्रवाशांना उपलब्ध होणार आहे. कोल्हापूर विमानतळावर चेक इन केल्यानंतर, त्यांना प्रवासाच्या अंतिम ठिकाणापर्यंत बोर्डींग पास मिळेल. प्रवाशांचे बॅगेजही परस्पर दुसऱ्या विमानात चढवले जाईल. त्यामुळे कोल्हापूर विमानतळावरून प्रवास सुखकर होणार आहे. कोल्हापुरातून देशातील 20 प्रमुख शहरांमध्ये इंडिगो एअरलाईन्सने थेट किंवा अन्य शहरांमार्गे आणि कनेक्टिंग फ्लाईटद्वारे सेवा उपलब्ध केली आहे.

# कर्नाटकमध्ये शाळा, कॉलेजमध्ये मास्क वापरणे बंधनकारक



आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू :** मागील काही दिवसांपासून चीनमध्ये करोना रुग्णांची संख्या वाढत आहे. याच कारणामुळे भारतातही प्रतिबंधात्मक उपायांद्वारे म्हणून योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. लसपुरवठा तसेच आरोग्य यंत्रणांना सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. करोना संसर्ग रोखण्यासाठी कर्नाटक सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. येथे शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मास्क लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. बुधवारी (२८ डिसेंबर) याबाबतचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार शाळा तसेच महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना मास्क वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.
सोबतच विद्यार्थ्यांनी करोना प्रतिबंधक नियम पाळावेत असेही आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच पब्स, विमानतळ, उपहारगृहे या ठिकाणीदेखील मास्क वापरणे तसेच इतर प्रतिबंधात्मक खबरदारी घेण्याचे अनिवार्य करण्यात आले आहे. कलबुर्गी विमानतळ प्रशासनाने याआधीच मास्क वापरणे अनिवार्य असल्याचे आदेश दिलेला आहे. संभाव्य कोरोना लाटेला तोंड देण्यासाठी काय तयारी असावी यावर चर्चा करण्यासाठी कर्नाटक सरकारने एक बैठक घेतली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आरोग्यमंत्री के सुधाकर होते. सोबतच या बैठकीला महसूलमंत्री आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आर अशोका हेदेखील उपस्थित होते. या बैठकीनंतर मास्क वारणे अनिवार्य असल्याचा निर्णय घेण्यात आला.
या निर्णयाबाबत महसूलमंत्री आर अशोका यांनी अधिक माहिती दिली आहे. आपल्या सल्लागार कक्षाने आंतरराष्ट्रीय प्रवाशांची तपासणी करण्याचा सल्ला दिलेला आहे. खबरदारी म्हणून करोनाची लक्षणं असलेल्यांवर उपचार करण्यासाठी बंगळुरू येथे दोन समर्पित रुग्णालये असतील," असे अशोका यांनी सांगितले.




# राहुल गांधींची सुरक्षा

आधुनिक केसरी

काँग्रेस खासदार राहुल गांधी हे गेल्या दोन महिन्यांपासून भारत जोडो यात्रेदरम्यान देशात फिरत आहेत. कन्याकुमारीपासून त्यांची ही यात्रा सुरू झाली होती. या यात्रेदरम्यान सर्वच क्षेत्रातील नामवंत व्यक्ती सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले. आता करोनाच्या पार्श्वभूमीवर एकीकडे यात्रा स्थगित करण्याची मागणी भाजपाकडून केली जात असताना आता राहुल गांधींच्या जीवितालाच धोका निर्माण झाल्याचा दावा काँग्रेसकडून केला जात आहे. यासाठी केंद्रीय यंत्रणांचा हवाला देण्यात आला असून या पार्श्वभूमीवर राहुल गांधींची सुरक्षा वाढवण्याची मागणी केली जात आहे. यासंदर्भात काँग्रेसने केंद्र सरकारला पत्रदेखील पाठवले आहे. राहुल गांधींच्या जिवाला धोका असल्याचा दावा काँग्रेसनं केला आहे. यासाठी केंद्रीय यंत्रणेच्या अहवालाचा हवाला देण्यात आला आहे. यासंदर्भात केंद्राला लिहिलेल्या पत्रामध्ये राहुल गांधींची सुरक्षा वाढवण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी टीव्ही ९ शी बोलताना यामागची काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली आहे. नाना पटोलेंनी आता पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेसच्या मागणीवर काय निर्णय घेतात, याकडे आमचं लक्ष असल्याचे म्हटले आहे. केंद्रीय यंत्रणेच्या माध्यमातून अहवाल समोर आला आहे की राहुल गांधींच्या जीविताला धोका आहे. त्यामुळे काँग्रेसकडून त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्याबाबत पत्र पाठवले आहे. आता आमचे लक्ष नरेंद्र मोदींकडे आहे की ते काय निर्णय घेतात. राहुल गांधी भारत जोडो यात्रेदरम्यान लोकांना भेटणारच. कारण सामान्य लोक राहुल गांधींना त्यांच्या यात्रेदरम्यान भेटतच आहेत. मात्र, केंद्रीय यंत्रणेच्या माध्यमातून समोर आलेल्या माहितीच्या आधारावर आम्ही ही सुरक्षा मागितली आहे, असे नाना पटोले म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना नाना पटोले यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत राज्य सरकारच्या धोरणावर टीकास्र सोडले. बोम्मई फक्त सीमेवर नाही, मुंबईपर्यंत आले आहेत. महाराष्ट्र तोडण्याचे कट कारस्थान भाजपा करत आहे हे लपून राहिलेले नाही. मुख्यमंत्री नरेंद्र मोदींचे हस्तक आहेत हे त्यांनी जाहीर केलं आहे. त्यामुळे त्यांच्या इशाऱ्यावर राज्यातील मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री काम करत आहेत. बोम्मई रोज आग ओकत आहेत. असे असताना राज्यातले सरकार गळचेपी करत आहे. त्यांचा खरा चेहरा जनतेला कळलेला आहे", असे नाना पटोले म्हणाले.

# कॅलेंडर बदला, स्वता:देखील बदला



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**वर्ष संपले की आपण उत्साहाने पहिले काम करतो ते भिंती वरचे क्यालेंडर बदलण्याचे.जुने ते विसरायचे असते.नव्याचे उत्साहाने स्वागत करायचे असते.सरले ते वर्ष आधीच्या दोन वर्षाच्या लॉक डाऊन ने ग्रासलेल्या काळा पेक्षा अधिक चांगले,उत्साहाचे होते.सर्वांनी सर्व उत्सव, सण जोमात,आनंदात साजरे केले. शाळा कॉलेजेस सुरू झालीत.लोक कामावर जायला लागले.मुख्य म्हणजे गेल्या दोन तीन वर्षात प्रत्येकालाच खूप काही शिकता आले. नवे कडू गोड अनुभव आले. घरगुती पातळी वरून तर सरकारी,पातळी पर्यंत प्रत्येक जण जबाबदारीने वागताना दिसले.एकमेकांना मदत करताना दिसले.**

इतर देशांच्या तुलनेत करोना काळातच नव्हे तर त्या नंतर आपण ज्या पद्धतीने परिस्थिती शी सामना केला त्याचे जगभर कौतुक झाले.अजूनही आपली गणना पूर्णपणे विकसित देशात होत नाही. आपल्याला विकसनशील देश मानले जाते. काही हरकत नाही.आपण किती पावले पुढे टाकली त्यापेक्षा जी टाकली ती किती विश्वासाने,सामर्थ्याने पुढे टाकली हे जास्त महत्वाचे.

उद्योगिक क्षेत्राला फटका बसला,बेरोजगारी वाढली,विकासाच्या गती वर परिणाम झाला हे खरे.कला क्षेत्रात देखील अनेकांच्या पोटावर पाय पडला. ती मंडळी अजूनही मूळ पदावर स्थिरावली नाहीत. शिक्षण क्षेत्राला देखील मोठा फटका बसला.ऑनलाईन शिक्षण,ऑनलाईन परीक्षा,शिथिल झालेले नियम,गुणवत्तेशी तडजोड,लांबलेली नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी,ह्या नकारात्मक बाबी विसरता येणार नाहीत.

आरोग्य क्षेत्रात आपले वेगळपण दिसून आले.खाजगी डॉक्टर,दवाखाने यांनी एकीकडे गैर फायदा घेतला. तर सरकारी पातळीवर नव्या लसीना मान्यता,वेगाने झालेले लसीकरण,ज्येष्ठ नागरिकांची विशेष दखल ,हे सकारात्मक मुद्दे उल्लेखनीय,प्रशंसनीय होते.ज्या देशांनी बेशिस्त नागरिकाचे ऐकले त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागले.युरोप अन् चीन ही बेशिस्तीची उदाहरणे.याची फळं ते भोगताहेत.

गेल्या वर्षात सरकारी पातळीवरील काही घटना मात्र चिंता जनक अशाच. त्यातही आपल्याच राज्य पातळीवर चाललेले राजकारण अतिशय घृणास्पद,खालच्या पातळीवर जाऊन पोहोचले. सध्या सत्तर ऐंशी त असलेल्या पिढीने गांधीजी,नेहरू,पटेल,सुभाष,डॉ आंबेडकर, बाजपेयीजी असे एकाहून एक कणखर,ध्येय निष्ठ नेतृत्व पाहिले. यशवंतराव चव्हाण यांचे कणखर,संयमी,सुसंस्कृत नेतृत्व पाहिले. आज कोणत्या पातळी वरचे नेते आपल्या नशिबी आलेत? आपली आपल्यालाच लाज वाटते हे सारे बघतांना,अनुभवताना! यांना आपणच निवडून दिले याचा आज प्रत्येकाला पश्चाताप होत असेल नक्कीच.यांना धडा शिकवणे हे देखील दुसऱ्या कुणाच्या नव्हे आपल्याच हातात आहे. इथे कोणत्याही पक्षाला दोष द्यायचा नाही. कारण सगळे एकाच माळेचे मणी आहेत.एकाला झाका दुसऱ्याला दाखवा,असा प्रकार! गांधीजी म्हणत त्याप्रमाणे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले पण स्वराज्य मिळाले का? त्याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. गांधींच्या भाषेत आपल्यावर आपले राज्य असणे म्हणजे स्वराज्य! धर्म, नीती, निःस्वार्थ भाव, या जीवन मूल्याच्या संवर्धनातून सामाजिक, नैतिक, आर्थिक स्वातंत्र्य मिळाले म्हणजे स्वराज्य प्राप्त झाले. आपल्याला उदात्त जीवन मूल्याचा विसर पडत चाललाय. राजसत्ता कुणाची याने काही फरक पडत नाही. आपण सर्वांनी एकत्र मिळून जीवन मूल्याच्या आधारे नवी यंत्रणा प्रस्थापित करावी लागेल.निवडून येणाऱ्या मंडळीनी, लोकशाही, घटना, देश निष्ठा, सारेच पायदळी तुडविण्याचे जे उद्योग चालवले आहेत, त्यांना धडा शिकवावा लागेल. कारण मतपेटी चा अधिकार तुमच्या आमच्या हातातच आहे. आता इतरांना दोष देत बघण्या पेक्षा स्वतःलाच सुधारावे लागेल. स्वतःलाच काहीतरी ठोस करावे लागेल.

भिंतीवर नवे कॅलेंडर लावताना हाच स्वराज्याचा,सुरज्याचा संकल्प सोडणे जास्त संयुक्तिक होईल. आपल्या तरुण पिढीत प्रतिभेची मुळीच कमी नाही. पण आपली बुध्दी, आपली ऊर्जा फोकस, च्यानलाईज करण्याची गरज आहे. नोकरी मागणारे हात नको आहेत. नोकरी देणारे हात देशाला हवे आहेत. जग सुधारण्याच्या भानगडीत पडण्या पेक्षा,विश्व गुरू वगैरे होण्या पेक्षा आपल्याच अवती भवतीच्या समस्या जाणून घेणे, त्या सोडविण्यासाठी हातभार लावणे, आपण देखील विकास प्रक्रियेचा सक्रिय भाग होणे जास्त महत्वाचे.आत्मविश्वास, परिश्रम, जिद्द, या त्रिसूत्रीच्या बळावर सारे काही शक्य आहे. हे हवे ते हवे अशी हाव करून जे आपण्य कमवत जातो, गोळा करतो त्याचा काही उपयोग होत नाही हे आपण गेल्या दोन वर्षात चांगले अनुभवले आहे.अन् आपल्या गरज मर्यादित ठेवल्या तर तेवढी पोटा पाण्याची सोय करणे प्रत्येकाला साज शक्य आहे. तेवढे रिसोर्सेस देवानेच निर्माण करून ठेवले आहेत आपल्या सर्वांसाठी. ती चिंता नको. मी आहे, मलाच हवे या संकुचित वृत्ती पेक्षा,बाकीचे आहेत म्हणून मी आहे, माझे अस्तित्व माझ्यावर नव्हे तर इतरावर,देवघेव वर, शेअरिंग, केयारिंग वर अवलंबून आहे,हा भाव हवा.आफ्रिकन देशात उबंटू नावाचे तत्व ज्ञान आहे.जे एका नीती कथे द्वारे सांगितले जाते. ती गोष्ट अशीः




एक शिक्षक शाळेत मुलासाठी स्पर्धा ठेवतात धावण्याची.दूर अंतरावर झाडाखाली एक चॉकलेट ची टोपली आहे. त्यात शंभर चॉकलेट ठेवली आहेत. जो मुलगा धावण्याच्या शर्यतीत पहिला येईल त्याला ती शंभर चॉकलेट ची टोपली बक्षीस मिळेल.स्पर्धा सुरू होते.शिक्षक शिटी वाजवतात. आता कल्पना करा. या मुलांनी काय केले असेल?पहिला नंबर यावा म्हणून ते जोरात धावायला लागले? नाही. त्यांनी एकमेकाचे हात धरले. ते एकत्र धावत झाडा जवळ एकाच वेळी पोहोचले. त्यांनी ते शंभर चॉकलेट, एकेक करून शेअर केले.जे आफ्रिकन आदिवासी शाळकरी मुलांना कळले ते आपल्या सर्वांना कार समजू नये? नव्या वर्षात, नव्या काळासाठी, स्वराज्यासाठी, सुराज्यासाठी बदलायचे असेल तर १ जानेवारी २०२३ हा चांगला मुहूर्त आहे.कॅलेंडर बदला.अन् त्या बरोबर स्वतः देखील बदला!

# बोम्मई एवढे आक्रमक का झाले ?




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना महाराष्ट्र सीमा प्रश्नावर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईं इतके आक्रमक व फुटिर भाषा का करत आहे.? एखादा प्रश्न न्याय प्रविष्ट असताना त्या प्रश्नावर भाष्य करू नये,हा न्यायालयाचा अवमान ठरत असतो. असं असताना कर्नाटकचे मुख्यमंत्री सीमावादावर आक्रमक बोलत आहे, महाराष्ट्र विरोधात विधानसभेत ठराव घेत आहे. याउलट महाराष्ट्राची भूमिका संयमाची,लवचिक व न्यायायालयाचा सन्मान करण्याची आहे. मात्र याउलट बसवराज बोम्मईं सिमावादाच्या प्रश्नाला अस्मितेचा प्रश्न करत महाराष्ट्राला डिवचट आहे.**

एवढेच नव्हे तर उभय देशातील सीमा प्रश्नावर गृहमंत्री अमित शहा यांनी मध्यस्थी केल्यानंतर देखील बसवराज अधून मधून महाराष्ट्राला डिवचट आहे.कर्नाटक विधानसभेत महाराष्ट्र विरोधात ठराव पारित करून कर्नाटकची एक इंच भूमी देखील सोडणार असल्याचा दावा केलेला आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर गेली अनेक वर्षे वाद असताना अधूनमधून खडाखडी होत असताना हा वाद इतका विकोपाला गेला नव्हता मात्र बोमई कर्नाटकचे मुखयमंत्री झाल्यापासून दोन्ही बाजूंचे संबंध ताणले जाते. परस्परांवर कुरघोडी केली जात आहे.. अगदी परस्परांच्या राज्यांच्या एसटी बसगाड्या रोखणे, पाट्यांवर डांबर फासणे, एकमेकांना इशारे देणे हा प्रकार घडतो आहे. . सीमा भागातील नागरिकांना त्याचे फारसे अप्रूपही राहिलेले नसावे, इतके हे सारे प्रकार अधूनमधून घडत आहे. आताही सीमाप्रश्नावरून दोन्ही बाजूंनी ताणले गेले आहे. पण या वेळी कर्नाटकचे मुख्यमंत्री अधिकच आक्रमक झालेले दिसतात. सोलापूर, अक्कलकोट, जत आदी सीमा भागांवर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी थेट दावा केला. सोलापूरमध्ये कर्नाटक भवन उभारण्याची घोषणा केली. दुसरीकडे, बेळगावचा दौरा करणाऱ्या महाराष्ट्राच्या मंत्र्यांना रोखा, असा दमच दिला. तसेच सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकार आक्रमक असल्याचा इशाराही दिला. बोम्मई एवढे आक्रमक का झाले, असा प्रश्न त्यातून निर्माण झाला. कर्नाटक व महाराष्ट्रात भाजपचे सरकार असताना व केंद्रात भाजपची सत्ता असताना उभय राज्यातील सीमा प्रश्न सामोपचाराने सोडविण्याची गरज असताना बोम्मई आक्रमक भूमिका घेत आहे.केंद्र सरकारने आपला प्रभाव वापरून दोन्ही राज्यांना लवचिक दृष्टिकोन स्वीकारून मध्यममार्ग काढण्यास सांगू शकते.मात्र केंद्र सरकार व कर्नाटकचे मुख्यमंत्री सीमा



प्रश्नांचे भांडवल करून राजकीय लाभ पदरी पाडून घेवू इच्छितात.सीमा प्रश्नाला अधिक आक्रमक करण्याचे कारण मतांच्या राजकारणात दडले आहे.केंद्र सरकारचे वरदहस्त लाभल्याने बोम्मई यांची हिम्मत वाढली आहे.भाजपला कर्नाटक राज्य आपल्या हातून जावू द्यायचे नाही.म्हणून केंद्र सरकार या प्रश्नाबाबत संयमी भूमिका घेत आहे. कर्नाटकात पुढील सहा महिन्यांत विधानसभेची निवडणूक होणार आहे. या दृष्टीने सीमाप्रश्नावर वातावरण तापणे हे कर्नाटकातील भाजपसाठी फायदेशीरच ठरणारे आहे. बेळगाव जिल्ह्यात विधानसभेच्या १८ जागा आहेत. म्हणजे राजधानी बंगळूरुनंतर विधानसभेच्या सर्वाधिक जागा असणारा परिसर बेळगावचाच. सीमाप्रश्नावर बेळगाव, निपाणी, खानापूर आदी भागांत वातावरण तापल्याचा राजकीय फायदा होतो. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने कन्नड अस्मितेच्या मुद्द्यावर भर देत मुख्यमंत्री बोम्मई यांनी प्रसंगी टोकाची भूमिका घेऊ, असे सूचित केले. गेल्या वेळी बेळगाव जिल्ह्यात भाजपचे आठ आमदार निवडून आले होते. यंदा ही संख्या भाजपला वाढवायची आहे. कर्नाटकात भाजपची सारी मदार ही बेळगाव, धारवाड-हुबळीचा समावेश असलेल्या उत्तर कर्नाटकावर आहे. दक्षिण कर्नाटकात भाजपसमोर काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे आव्हान असेल. राजधानीत बंगळूरुही भाजपसाठी आव्हानात्मक असेल. यामुळेच उत्तर कर्नाटक आणि किनारपट्टीवरील मंगलोर, दक्षिण कन्नड या भागांवर भाजपची मदार असेल. हे सारे लक्षात घेऊनच बोम्मई यांनी सीमाप्रश्नाचा मुद्दा अधिकच तापविला आहे.



सोलापूर, अक्कलकोट, जत या कन्नड भाषकांची लक्षणीय संख्या असलेल्या भागांवर दावा करून कानडी अस्मितेचा मुद्दा चर्चेत आणला जात आहे. कानडी भाषकांच्या मतांकरिता बोम्मई यांनी कानडी अस्मितेला साद घातली आहे. सत्ता कायम राखण्याकरिता हिजाब आदी विषयांवरून धार्मिक ध्रुवीकरणानंतर मुख्यमंत्र्यांनी सीमा भागांत कानडी भाषक मते मिळावीत या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# क्रूर जातपंचायतींना मूठमाती कधी मिळणार ?



कृष्णा चांदगुडे

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व प्रसारमाध्यमांच्या दबावामुळे महाराष्ट्र सरकारने सन २०१६ मध्ये सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा बनविला. असा कायदा बनविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या कायद्यात जातपंचायत बसवून न्यायनिवाडे करणे व बहिष्कृत करणे गुन्हा ठरविण्यात आले आहे. गुन्हा सिद्ध झाल्यावर आरोपीस तीन वर्षांपर्यंतची शिक्षा व एक लाख रुपये दंड अशी शिक्षा आहे. सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा बनविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, मात्र या कायद्याबाबत अजूनही अनेकांमध्ये अज्ञान संभ्रम आहे. आपल्या देशात अंदाजे आठ हजाराहून अधिक जाती आहेत.**

त्यातल्या त्यात जाती, उपजाती, पोटजाती यांची सतत निर्मिती सुरू असते. आहार, विहार, वस्त्र, भाषा, व्यवसाय, स्तलांतर अशा अनेक कारणातून पोटजाती निर्माण होत जातात. जातींचे वैवाहिक, सामाजिक, आर्थिक जीवन नियंत्रित करण्याचे काम जातपंचायती करतात. जातींचे रक्षण करण्यासाठीच जातपंचायतींची निर्मिती झाली असल्याचे पंचांचे म्हणणे असते.

या आठवड्यात नाशिक जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीने बाळाला जन्म दिला. तिचा बालविवाह सामाजिक कार्यकर्त्यांनी थांबवला होता. परंतु नंतर जातपंचायतीच्या पंचांसमोर गुपचूप तो विवाह लावण्यात आला. चार महिन्यानंतर नवरा-बायकोत वाद झाल्याने जातपंचायत बसली. शंभर रुपयांच्या बॉण्ड पेपरवर पंचांनी मुलीच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने घटस्फोट लिहून घेतला. वेदनादायी बाब म्हणजे तिच्या नवऱ्याला दुसऱ्या लग्नासाठी मोकळीक देण्यात आली. मात्र तिने दुसरे लग्न केल्यास आपल्या पहिल्या पतीला तिने एक्कावन्न हजार रुपयांचा दंड देण्यात येईल, अशीही 'सुनावणी' करण्यात आली. दंडाची रक्कम पहिल्या नवऱ्यास व पंचास द्यायची असे तिचा अंगठा घेऊन लिहून घेण्यात आले. पंचायतीचे असे हे अघोरी न्यायनिवाडे!

आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांना जात - बहिष्कृत केले गेले. अग्रगण्य समाजसुधारक लोकहितवादी परदेशाला गेले म्हणून त्यांना एक समाजाने वाळीत टाकले. महात्मा फुले यांच्या सुनेला अग्निसंस्कार करण्यासाठी कोणीही जातबांधव पुढे आला नाही. ती व्यवस्था पुण्याच्या त्यावेळच्या कलेक्टरला करावी लागली. प्रत्येक जातीच्या जातपंचायतींच्या कार्यवाहीत फरक दिसून येतो. जातींचे पंच परंपरेने चालत आलेले असतात. अनेक जाती आपल्या पंचांना देवासमान मानतात. त्यामुळे त्यांचा शब्द अंतिम असतो. पंच नियम बनवतात, न्यायनिवाडे करतात, शिक्षाही करतात. शिक्षा आर्थिक, शारीरिक, मानसिक, अगदी मृत्यूदंडापर्यंतही असायची. पंच पाच किंवा अधिकही असतात. त्यांच्या निर्णयाविरोधात फारसे कुणी बोलत नाही. आव्हान देणे तर दूरच. जर कुणी न्यायालयात जाऊन निर्दोष सुटून आला तरी त्याला वेगळी शिक्षा दिली जाते. बारसे, मुलामुलींचे बघण्याचे कार्यक्रम अथवा मयताचे काम असो सर्व पंचांच्या उपस्थितीत व देखरेखीखाली होतात. यापूर्वीही असे अनेक प्रकार घडले आहेत, घडत आहेत. त्यातले फारच थोडे उजेडात येतात. महिला सबलीकरणावर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. काही दिवसांपूर्वी



याच परिसरात जातपंचायतीने एक रुपयात एक घटस्फोट घडवून आणला होता! महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जातपंचायत मूठमाती अभियान सुरू केले, तेव्हापासून जातपंचायतींचे दाहक वास्तव समाजासमोर आले आहे. जातपंचायतींकडून महिलांना अमानुष शिक्षा दिल्या जातात. वानगीदाखल काही उदाहरणे घेतली तरी जातपंचायतींचे क्रौर्य लक्षात येते. एका जातपंचायतीने एका महिलेला दोन लाख रुपये आर्थिक दंड करत मानवी विष्ठा खाण्याची जबरदस्ती केली. इतकेच नव्हे तर पीडित महिलेस जातपंचायतमध्ये नग्न करण्यात आले. हा अपमान सहन न झाल्याने नवरा बायको दोघांनीही विष प्राशन केले. त्यात नवऱ्याचा मृत्यू झाला. मागील वर्षी सोलापूर जिल्ह्यात पंचांनी अशीच अमानुष शिक्षा दिली होती. पीडित व्यक्तीच्या डोक्यावर मानवी विष्ठा व मूत्र असलेले मडके ठेवून ते फोडण्यात आले. अकोला जिल्ह्यात एका महिलेला पंचांची थुंकीचा चाटण्याची शिक्षा देण्यात आली होती. नंदुरबार जिल्ह्यात एका मुलाच्या हातावर तापवलेली लालबुंद कुऱ्हाड ठेवण्यात येणार होती, पण अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या हस्तक्षेपामुळे हा प्रकार थांबला. उस्मानाबाद जिल्ह्यात एका महिलेला चारित्र्याच्या संशयावरून उकळत्या तेलात हात घालून नाणे बाहेर काढण्याची शिक्षा देण्यात आली होती. एका समाजात तर लग्नाच्या पहिल्या रात्री नववधूची कौमार्य परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उत्तीर्ण झाले तरच लग्न ग्राह्य धरले जाते, अन्यथा मोडले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मागील महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडून एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यानुसार जातपंचायत होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनाला सक्त ताकीद देण्यात आली आहे जातपंचायतविरोधी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. मात्र कायद्याचे नियम अजून तयार झालेले नाहीत. या कायद्याबाबत पोलिसांमध्येही संभ्रम आहे. तो दूर होण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. याविषयी मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन व कायद्याबाबत जाणीवजागृती झाली तरच जात पंचायतींना मूठमाती देणे शक्य होईल.

# बार्शीच्या स्मिता रगडेची प्रेरणादायी झेप

आधुनिक केसरी

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे आणि वाहिनीसाहेब झाडबुके यांनी बार्शीसारख्या ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचवली. त्यामुळेच, तालुक्याच्या गाव खेड्यातील मुलं-मुली उच्च शिक्षण घेऊन आपल्या क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत. बार्शीतून अनेक अधिकारी घडले, शिक्षक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर्सची जडण घडण येथेच झाली. काहींनी विदेशातही बार्शीची सरशी केली आहे. तालुक्याच्या उपळाई ठोंगे येथील स्मिता रगडे यांनीही असंच यशाचं शिखर गाठलं. इंजिनिअरिंगनंतर फ्रान्समधील नामांकित कंपनीत त्या कार्यरत असून तब्बल 60 हजार युरोचं पॅकेज त्यांना मिळालं आहे.



स्मिता रगडे-भोंग या मूळच्या उपळाई ठोंगे गावच्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या. त्यामुळे, साहजिक गावातीलच किसान कामगार विद्यालयात त्यांचं इयत्ता १० वी पर्यंतचं शिक्षण झालं. याकाळात घर ते शाळा अशी दररोज ५ किमीची पायपीट करून त्यांनी आपली शिक्षणाची आवड जोपासली. त्यामुळेच, आज त्यांची गगनभरारी ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण करणारी आहे.

स्मिता यांनी १० वी नंतर बार्शीतील श्री शिवाजी महाविद्यालयात १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर, उस्मानाबाद येथील तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजमधून बीई इलेक्ट्रॉनिक्स & टेलिकम्युनिकेशनची पदवी घेतली. विशेष म्हणजे उपळाई ठोंगे गावातून पहिली महिला इंजिनिअर होण्याचा मानही त्यांनी पटकावला, त्यांचे पती सचिन भोंग अभिमानाने सांगतात. इंजिनिअरिंगनंतर पुण्यात HCL आणि जॉन डिअर कंपनीत त्यांनी नोकरी केली. दरम्यानच्या काळात तिचे पती सचिन यांन नवरानी मित्र बनून मोलाची साथ दिली. त्यामुळेच, पुढे गगनभरारी घेण्याचा आत्मविश्वास वाढला. समायरा आणि शिवांश या दोन चिमुकल्यांची जबाबदारी सांभाळत घर आणि नोकरीचा समतोल साधला. अर्थात, यशस्वी महिलेच्या पाठीशीही एक पुरुष असतो, हेच त्यांचे पती सचिन यांनी दाखवून दिले. पी.डब्ल्यू.डी. विभागात ठेकेदार असतानाही त्यांनी स्मिता यांच्या करिअरला बुस्ट देण्याचं काम केलं. त्यामुळेच, स्मिता यांनी टॅलेंट आणि अनुभवाच्या जोरावर पॅरिस गाठलं. साधारणपणे चार ते पाच हजार लोकवस्तीच्या गावातील या मुलीनं आकाशाला गवसणी घालणार कार्य केलेलं आहे... स्मिता आज फ्रान्समधील फॉर्व्हिया कंपनीत सॉफ्टवेअर प्रोजेक्ट लीड पदावर कार्यरत आहेत. १ ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांनी पॅरिसमध्ये ऑफिस जॉईन केलेलं आहे.. त्यांना येथील कंपनीत ५१ लाख रुपये प्रतिमाह पगार आहे. त्यामुळेच स्मिता रगडेची ही कर्तृत्वाची विशाल झेप आकाशाला गवसणी घालणारी आहे... बार्शी जवळील एका खेड्यातील मुलींनी मिळवलेले हे अपूर्व यश केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशाच्या ग्रामीण भागातील मुलींसाठी एक नवी दिशा देणारा..नवी प्रेरणा देणारा नक्कीच आहे असंच म्हणावं लागेल.... हो ना ....

**सुधीर कोर्टीकर, मो.नं.9765553312**
**जुई बी-६ अपार्टमेंट , तिरुपती पार्क ,**
**गुरु साहनी नगर , एन-४ सिडको , औरंगाबाद...४३१००**

# तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे युवा वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब, रेस्टॉरंट मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके उडवणे, डी जे च्या किंवा लाऊडस्पीकरच्या तालावर चित्र विचित्र अंगविक्षेप करत नाचणे यासारख्या गोष्टी केल्या जातात.**

यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण यावर्षी कोरोनाचे कोणतेही निर्बंध नाहीत. मागील दोन वर्ष कोरोनाचे निर्बंध असल्याने या गोष्टी तरुणांना निर्धास्तपणे करता आल्या नाही असे असले तरीही काही महाभागांनी लपून छपून या गोष्टी केल्याच. यावर्षी तर कोणतेही निर्बंध नसल्याने आणि शासनानानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे स्वागत अशाप्रकारे करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे. दारू पिऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच झाली आहे. दारू पिऊन गाडी चालवताना बऱ्याचदा अपघात होतो आणि त्यात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात, काही तर कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबे रस्त्यावर येतात. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह दुसऱ्याचा जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसोबत इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बांधनाची ऐसीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या - वाईट गोष्टी बाजूला सारून नववर्षाच्या सुर्योदयाच्या साक्षीने नवसंकल्पांचा अवलंब करणे, त्याचे




निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चत्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटाने बळीराजा आत्महत्या करत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. मागील दोन ते तीन वर्ष जगावर कोरोनारुपी महामारीचे संकट होते. कोरोनाने होत्याचे नव्हते केले. कोरोनाने अनेकांचा रोजगार हिरावून नेला. काहींच्या घरात कोरोनाने शिरकाव केला. काहींच्या घरातील घरातील कर्ता पुरुष कोरोनाने हिरावून नेला. कोरोनामुळे शाळा बंद झाल्या. ऑनलाइन शिक्षणाची साधने उपलब्ध नसल्याने हजारो मुले शिक्षणापासून वंचित राहिली. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना तसेच शहीद जवानांच्या मुलांना मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. कोरोनाने रोजगार हिरावून नेलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत करून, दिव्यांग, अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याची मदत करून, वृद्धाश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नवीन वर्षाची सुरवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचा प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. गोरगरीब आणि गरजवंतांना त्यांच्या गरजेच्या वेळी त्यांना हवी ती मदत केल्यास, त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव आपण निर्माण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण होऊ शकते. जुने जाऊ द्या मरणालागुनी.... जाळुनी किंवा पुरुनी टाका....... या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

# समाधानी राहणे महत्त्वाचे

आधुनिक केसरी

प्रत्येक माणुस आज जगण्यात समाधान शोधत आहे. माणसाचे आयुष्य हे अनेक चढ उताराचे आहे. एखादी गोष्ट ही आपल्या मनासारखी नाही झाली तर पटकन निराश होतात. त्यासाठी माणसाने कितीही प्रतिकूल परिस्थिती असु द्या समाधानी रहायला शिकले पाहिजे. शोधुनही न सापडणारी गोष्ट म्हणजे समाधान होय खरं म्हणजे माणसाने आयुष्य समाधानाने जगले पाहिजे. आयुष्यात येणारा प्रत्येक क्षण हा महत्वाचा आहे. प्रत्येकाने आपलं आयुष्य समाधानाने जगले पाहिजे.कोण काय करतंय किंवा कोण कसे वागत आहे. याकडे लक्ष न देता आपण किती समाधानी आहोत याकडे पाहिले पाहिजे. आपणाला हे आयुष्य मिळाले आहे ते आणखी सुंदर कसे बनवता येईल याकडे पाहिले पाहिजे. आज माणसाकडे सर्व काही आहे .पण समाधान नावाची गोष्ट नाही.



पुर्वीचा काळ खरोखर सुखाचा होता. माणसे समाधानी होती. घरे पण छोटी होती.माणसात माणुसकी होती. माणसं प्रेमळ होती. राहणी साधी होती पण एकोपा होता. परंतू आज काळ बदलला माणसं बदलली बंगले, फ्लॅट आले माणसं दुरावली. त्यामुळे माणसाच्या चेहर्यावरील कुठेतरी समाधान हरवल्यासारखे वाटत आहे.

आयुष्याच्या प्रवासात समाधानी असणे ही सर्वात मोठी संपत्ती आहे. ही ज्यांना सापडली तीच माणसे आज समाधानाने जगत आहेत.समाधानाने आयुष्य जगणे गरजेचे आहे. जो माणुस समाधानाने जगतो तोच खरा श्रीमंत माणुस होय. आपण जीवनाकडे एक उत्सव म्हणून पाहीले पाहिजे. आज काळ गतीने पुढे सरकत आहे. जीवनात अतिशय बदल होत आहेत.ते आनंदाने स्विकारा. आहे त्यात समाधानी रहा. उगाच खोट्या प्रतिष्ठेपायी दुःखाला कवटाळत बसू नये प्रत्येक गोष्ट मनासारखी होईल असे नाही. त्यामुळे समाधान शोधा आयुष्य बदलवून जाईल.

ठेविले अनंते तैसिचे रहावे.चित्ती असु द्यावे समाधान या अभंगानुसार माणसाने समाधानाने राहीले पाहिजे. आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे, आपल्याला समाधान कशात आहे हे शोधले पाहिजे. आयुष्यात समाधान मानणे महत्वाचे आहे. प्रत्येक गोष्टीत आपल्याला एक नवा अनुभव मिळत असतो.अनेकांच्या आयुष्यात बरा वाईट काळ येत असतो. तो कधीच कायमस्वरूपी नसतो. त्यासाठी माणसाने समाधानी रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**संतोष दत्तू शिंदे**
**संपर्क क्र. 7721045845**

# अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचे नेतृत्व !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दलितांच्या उद्धारासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. महाडचा सत्याग्रह व नासिकचा काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह यांत ते आघाडीवर होते. त्यावेळी त्यांना निर्दय मारपीट सहन करावी लागली व तुरुंगातही जावे लागले होते. भारत सरकारने गायकवाडांना इ.स.१९६८मध्ये पद्मश्री हा पुरस्कार दिला. • त्यांच्या स्मृतींना उजाळा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी देत आहेत.**

भाऊराव कृष्णराव गायकवाड ऊर्फ दादासाहेब गायकवाड हे भारतीय राजकारणी, समाजसेवक आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासू सहकारी होते. ते डॉ.आंबेडकरांचा वारसा लाभलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष होते, तसेच पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य होते. मुंबई विधानसभेचे सदस्य- आमदार, लोकसभा सदस्य व राज्यसभा सदस्य- खासदार म्हणून त्यांनी कार्य केलेले आहे. डॉ.बाबासाहेबांच्या अनेक कामांत दादासाहेबांचा सहभाग होता. दि.२ मार्च १९३०च्या वेळी डॉ.आंबेडकरांना दादासाहेबांची खुप मदत झाली. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली आणि बाबासाहेबांच्या पुढाकाराने दिलेल्या लढ्याचा एक भाग म्हणजे हा सत्याग्रह होता. काळाराम मंदिर हे नाशिक मधील प्रसिद्ध रामाचे मंदिर आहे. त्यांच्या मानसन्मानार्थ - कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाद्वारे २००२पासून दिला जाणारा पुरस्कार आहे. दादासाहेबांच्या नावाने महाराष्ट्र राज्य सरकारची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना या नावाची एक योजना सन २००४पासून सुरू आहे. सन २०१२साली तिचा लाभ ३८ भूमिहीनांना झाला होता. मात्र त्यापूर्वी केवळ २५० लोकांना जमिनी मिळाल्या होत्या. भारत सरकारने गायकवाडांना इ.स.१९६८मध्ये पद्मश्री हा पुरस्कार दिला. नाशिकमध्ये एका सभागृहाला दादासाहेब गायकवाड सभागृह नाव दिले आहे. मुंबईत अंधेरीभागात दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र नावाची संस्था आहे. दादासाहेब गायकवाड यांचा परिचय करून देणारी एक १३ मिनिटांची डॉक्युमेंटरी फिल्म सुद्धा तयार केली आहे. भाऊराव कृष्णराव गायकवाड हे विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ज्येष्ठ सहकारी, दलित समाजाचे नेते व सुधारक होते. ते सर्वसामान्य लोकांत दादासाहेब या नावाने ओळखले जात. दादासाहेबांचा जन्म नासिक येथे दि.१५ ऑक्टोबर १९०२ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. तेथील सरकारी माध्यमिक शाळेत त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर डॉ.आंबेडकरांसमवेत त्यांनी दलितोद्धाराच्या कार्यास सुरुवात केली. सन १९४२ ते ४६ या काळात ते सरकारी नोकरीत होते. त्यांनी जालंदर व कुरुक्षेत्र येथे निर्वासितासांठी खास अधिकारी म्हणूनही काम केले. नासिकच्या ज्ञानविकास केंद्र या शिक्षणसंस्थेचे तसेच नागपूरच्या डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष, तसेच पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे ते सदस्य होते. प्रबुद्ध भारत या साप्ताहिकाच्या संपादक मंडळाचे अध्यक्ष तसेच मुंबई येथील शेड्यूल्ड कास्ट्स इंप्रूव्हमेंट ट्रस्टचे ते विश्वस्त व सदस्य होते. नासिक, नागपूर, पुणे, मुंबई आदी ठिकाणच्या अनेक सार्वजनिक संस्थांशी ते या ना त्या प्रकारे निगडित होते. ते मुंबई विधानसभा तसेच लोकसभा यांचे सदस्य होते. लोकसभेत रिपब्लिकन पक्षाच्या गटाचे नेतेही राहिले होते. नंतर त्यांची राज्यसभेवर निवड झाली. सन १९५३मध्ये त्यांना भूमिविषयक सत्याग्रहात तुरुंगवास भोगावा लागला. त्यानंतर त्यांनी भूमिहीनांना भूमी मिळावी, म्हणून मोठे आंदोलन सुरू केले होते. त्यांनी



विश्वरत्न डॉ.आंबेडकरांसोबत बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्यासोबत प्रथमपासून त्यांनी आघाडीवर राहून काम केले. त्यांच्या गुणांची आणि नेतृत्वाची अनेक वेळा कसोटी लागली. डॉ.बाबासाहेबांचे एक ज्येष्ठ, विश्वासू व कर्तबगार सहकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. साधी राहणी, मनमिळाऊ स्वभाव, विशुद्ध चारित्र्य, प्रखर ध्येयनिष्ठा, प्रभावी वक्तृत्व, अन्यायाविरुद्ध झगडण्याची जिद्द इत्यादी गुणांमुळे त्यांचे नेतृत्व आदरणीय ठरले.

सन १९६८ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा व समाजसेवेचा गौरव केला. त्यांच्या कार्यरत जीवनामुळेच लोक त्यांना कर्मवीर ही उपाधी लावत होते. दि.२९ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे अशा या थोर समाजसुधारक दादासाहेबांचे निर्वाण झाले. !! स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या अविस्मरणीय कार्यांना मानाचा लवून मुजरा आणि पावन चरणी लेखरुपी ही शब्दसुमने !!

# मागे वळून पाहताना....2022



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**2022 साल संपायला आता काही दिवसांचा अवधी आहे 2022 सालातील घटनांची डायरी डोळ्यासमोर उभी राहते. अर्थातच या वर्षभरात जश्या काही आनंददायी घटना घडल्या तश्याच काही वाईट आणि मनाला क्लेश देणाऱ्या घटना घडल्यात. 2022 मध्ये आनंद देणारी महत्वाची घटना होती ती म्हणजे कोरोना चे कमी होणे. आणि जनजीवन सुरळीत होणे. त्यामुळे वर्षभरात सर्वच जण त्या दृष्टीने मोकळ्या पणाने वावरत होते. एक भीतीचे तयार झालेल वातावरण कमी झालं होतं, परत एकमेकांमध्ये जो संवाद खुंटला होता तो पूर्ववत सुरू झाला होता.**

जो तो आपल्या इच्छेप्रमाणे एकमेकांच्या कडे जात होते. धार्मिकस्थळी, पर्यटनस्थळाला भेट देत होते,जत्रा ( यात्रा ) भरल्या होत्या, चित्रपटगृह, नाट्यगृह, सुरू झाले होते.वाहतूक मुक्तपणे सुरु होती. थोडक्यात काय तर वाईट घटनांचा काळ सर्वजण विसरत चालले होते. मनावरचे दडपण कमी झाले होते.

राजकीय गोटात अशांतता होती. एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यानंतर शिवसेनेचा वेगळा गट स्थापन झाला आणि उद्धव ठाकरे यांचे सरकार अल्पमतात आले, आणि शिवसेनाप्रमुखांच्या मुलाला मुख्यमंत्री पदावरून खाली उतरवल्याने पुण्य मिळत असेल तर त्यांना मिळू द्या,त्यांचा हा आनंद कोणीही हिरावून घेऊ नये असे म्हणत त्यांनी राजीनाम्याची घोषणा केली. त्यामुळे बहुमत चाचणीची वेळ आलीच नाही.

बाळासाहेब ठाकरेंनी ज्याहेतूने शिवसेनेची स्थापना केली होती आणि मराठी माणसाला ताकद दिली, हिंदुत्वाची मशाल पेटवली होती होती ती मुळ शिवसेना या वर्षातच संपली.दुभंगली. ही या वर्षातील अतिशय वाईट घटना म्हणावी लागेल. अर्थातच ती हे महाआघाडीचे सरकार स्थापन झाल्यावरच प्रक्रिया सुरु झाली होती .परंतु आता ती पूर्णपणे संपली असे म्हणायला हरकत नाही, कारण ज्या पक्षाशी बाळासाहेबांचे तत्व कधीही जमले नाही त्यांच्याशीच केवळ सत्तेसाठी हात मिळवणे करून ही सत्ता स्थापन केली. आताही भाजपच्या मदतीने सरकार स्थापन झाले असले तरी पूर्ण मंत्रिमंडळ अस्तित्वात आले नाही त्याचीही कारणे आहेत. कारण 50 आमदारांनी गटांनी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळात प्रत्येकालाच मंत्री पदाची अपेक्षा होती, आहे. परत आता दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता संपलेलीच आहे. कदाचित एकनाथ शिंदे हे सुद्धा भाजपमध्ये जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकनाथ शिंदे यांचे सरकार स्थापन झाले असले तरी त्यांच्यातही अस्वस्थता आहे. जो तो आपली कामे कशी साध्य करून घेता येईल याकडेच बघत आहे. काहींनी काम होत नसल्यामुळे वर्षा बंगल्यावरच मुख्यमंत्र्यांच्या सहाय्यकाशी बाचाबाजी केल्याचे मध्यंतरी वृत्त प्रसिद्ध झाले होते. म्हणजे अजूनही मंत्रिमंडळाचा विस्तार केल्यास काहीही होऊ शकते. राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना,राष्ट्रीय काँग्रेस हे सरकार पडण्याचीच वाट पाहत आहे. सत्तेचा गैरवापर करून राजकीय दहशत निर्माण केली जात आहे असे विधान शरद पवार यांनी केले आहे. आणि जनता आज ना उद्या ही सत्ता बरखास्त केल्याशिवाय राहणार नाही असे म्हटले आहे. तर खासदार सुप्रिया सुळेंनी म्हटले आहे की पवार साहेबांनी महाराष्ट्राचा एक दौरा केला की सरकार कोसळत असते. म्हणजे त्यांना सरकार पाडण्यातच रस आहे सर्वसामान्यांच्या प्रश्न, अडचणीशी कोणाला देणे घेणे नाही.

कालावधीत राजकीय नेत्यांची विधान बघितल्यास पातळी घसरली असलेली जाणवते. कोण काय विधान करते आणि केव्हा काय बोलते याचे भानच राहिले नाही.अगदी रेडे,डूक्कर,कुत्रे, म्हणण्या पर्यंत मजल गैली. राज्यपाल यांनी शिवाजी महाराजांबद्दल केलेले विधान त्याचा माफी नामा विपर्यास करण्यात आला आणि बराच गोंधळ झाला. कोणीही असो मग राज्यपाल असो मुख्यमंत्री असो मंत्री असो खासदार आमदार असो किंवा कोणीही जो मंचावर जाऊन भाषण करतो आहे त्यांनी आपल्या सर्वच महापुरुषांची बदनामी होईल असे वक्तव्य करू नये आणि चुकीने काही तसे झाल्यास त्वरित त्याविषयी माफी मागावी ही महत्त्वाची गोष्ट सगळ्यांनी लक्षात ठेवली तर असे वादाचे आणि राज्यभरात वातावरण बिघडेल असे प्रसंगच निर्माण होणार नाहीत. एकीकडे शिवाजी महाराजांना जाणता राजा म्हणण्याची गरज नाही असे म्हणणारे शरद पवार शिवाजी महाराज विषयी उलटी सुलटी विधान केल्यास महाराष्ट्रातील वातावरण बिघडेल असे विधान करून मोकळे झाले. मुस्लिम मतांच्या भीतीने शरद पवार कधीही छत्रपती शिवाजी महाराजाचे नाव घेत नाहीत असे मत राज ठाकरे यांनी मांडले आहे. एक तर सर्वच नेत्यांनी आपल्या आदरणीय अशा व्यक्तींबद्दल वादग्रस्त विधाने करू नयेत आणि बोलायचे असल्यास अतिशय संयमाने बोलण्याची गरज निर्माण झालेली आहे.

छगन भुजबळ यांनी केलेले विधानाने वाद उपस्थित झाला. शाळेमधील सरस्वती शारदामाता यांचे फोटो हटवायला हवेत असे विधान त्यांनी केले. त्यानंतरही पुन्हा देवी सरस्वतीनी किती शाळा काढल्या किती लोकांना त्यांनी शिक्षण दिले, शंकर पार्वती, तीस कोटी देवांचा अभ्यास सुरू करा, अशा प्रकारे त्यांनी वादग्रस्त विधाने केले ज्यावेळेला एखादा राजकीय नेता मोठमोठ्या नेत्यांची नावे घेऊन भाषणाला सुरुवात करतो पण त्याआधी त्यांनी आपण त्यांच्या विचारांचे किती अनुकरण करतो हेही लक्षात घ्यावे. उगीच विधाने करायचे आणि वातावरण बिघडवायचे हे आता बंद व्हायला हवे आहे. त्यांच्या या भांडणात मूळ प्रश्न आहे पाणी, वीज टंचाई, महागाई, बेरोजगारी महिलांवरील अत्याचार, शेतकऱ्यांचे प्रश्न याकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष होते. जनता त्रस्त आहे..

राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा काढली परंतु त्या यात्रेत सतत त्यांनी सावरकरांचा विरोध केला माफी वीर म्हणून त्यांचा उल्लेख केला परंतु त्यांना- इंदिरा गांधी यांनी सावरकरांच्या बाबतीत जे म्हटले होते की "साहस आणि देशभक्तीचे दुसर नाव म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर." "असंख्य लोकांना त्यांच्यापासून स्फूर्ती मिळाली होती". हे विधान राहुल गांधींना दाखविले गेले.

मी ब्रिटिश साम्राज्याचा विश्वासू नोकर राहू इच्छितो" हे महात्मा गांधींचे विधानही त्यांना दाखविले गेले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना सावरकरांच्या सन्मानार्थ टपाल तिकीटही प्रसिद्ध केले होते सावरकरांवर चिखलफेक करणाऱ्या राहुल गांधींना भारताचा इतिहास माहिती ना काँग्रेसचा अशा प्रकारे शब्दात देवेंद्र फडणीस यांनी आपला संताप व्यक्त केला आणि चोख उत्तर दिले.

भ्रष्टाचाराने तर वर्षभरात कळस गाठला आहे. महाविकास आघाडी सरकार म्हणजे एक अभद्र युती होती असेच म्हटले गेले केवळ सत्तेसाठी सर्व घडून आले आणि मग भ्रष्टाचाराचा कळस झाला ते आपण बघतोस शासन प्रशासनाचा बरोबरीने खेळ सुरू होता काही उच्च अधिकारी तर काही मंत्री जेलमध्ये गेले त्यानंतर आलेले एकनाथ शिंदे यांचे सरकार हे 50 खोके सरकार म्हणून ओळख करून दिली गेली अर्थातच सरकार स्थापनेत भ्रष्टाचार, आता काल परवाचीच बातमी आहे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी वाशीम येथील गायरान जमिन प्रकरणात हायकोर्टाने ताशेरे ओढले आहे. पार्श्वभूमीवर माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील,अजित पवार यांनी त्यांच्या राजीनामाची मागणी केली आहे व फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल दावा अशी मागणी केली आहे. सिल्लोड महोत्सवाच्या कार्यक्रमाला अधिकाऱ्यांना पंधरा कोटीची रक्कम जमा करण्याची उद्दिष्ट दिले गेले हा भ्रष्टाचार नाहीतर काय अजूनही अनेक बाबी आहेत. यावर मुख्यमंत्र्यांनी अब्दुल सत्तार यांची चौकशी करू व विरोधी पक्षांचे प्रकरणांची चौकशी करू असे म्हटले आहे. जरंडेश्वर कारखान्याचे उदाहरण समोर आहे. पन्नास साठ लाखाच्या कारखन्यावर पाचशे सहाशे कोटी कर्जाची उचल.अशी बरिच प्रकरणे आहेत... हे काय आहे. परवा देवेंद्र फडणीस यांनी साखर कारखान्या विषयी चे परखड विचार व्यक्त केले ते योग्यच आहे म्हणजे निदान अशा व्यवहारात मोठे भ्रष्टाचार होणार नाही. आणि मागील काळात जर काही झाले असेल तर त्याच्यावरही कारवाई होणे तितकेच आवश्यक आहे. कोरोना काळातील भ्रष्टाचाराच्या अनेक गोष्टी उघडकीला येत आहेत. 17 लाखाची गाडी दोन कोटीला खरेदी केली ह्या प्रकरणात देवेंद्र फडणीस यांनी चौकशी आदेश दिले आहेत, म्हणजे भ्रष्टाचार कुठल्या थराला गेला आहे हे आपल्या समोर येते. शासन आणि प्रशासन याबाबतीत हातात हात घालून चालत आहेत.

राजकारणात कोणी कोणाचा मित्र नसतो आणि कोणी कोणाचा शत्रू असतो याची उदाहरणे आपण वर्षभरात बघितलीत. किमान समान कार्यक्रम आखून शिवसेना, राष्ट्रवादी, आणि राष्ट्रीय काँग्रेस सत्तेसाठी एकमेकाची मित्र बनलेत. भाजप सोडून सत्तेच्या लालसे पोटी एकनाथ खडसे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. त्यांचाही आता महसूल बुडवण्याचा आरोप करून घोटाळा उघडकीला आणल्याचे वृत्त आहे. असे अनेक उदाहरणे आहेत.

महिलांवरचे अत्याचार कमी होत नाही. काल परवाचीच गोष्ट मुंबई येथे लोअर परळला एका पंधरा वर्षे वयाचे मुलीवर सहा जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादाय घटना शनिवारी उघडकीस आली आहे. अशा अनेक घटना घडत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच आहे.

गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लागल्याचे दिसत आहे शिंदे फडणीस सरकार त्या बाबतीत निर्णय घेत आहेत. समृद्धी महामार्ग, मेट्रो रेल्वे असो वृक्ष संवर्धन, वृक्ष लागवड, असो अनेक योजना कार्यान्वित होत आहेत. शेतकऱ्यांसाठी मागील सरकारी बंद केलेली जलयुक्त शिवार योजना परत सुरु झाली आहे. नियमित कर्ज पेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आश्वासन दिलेले पन्नास हजार रुपयांच्या अनुदान वाटप सुरू झालेली आहे. पंतप्रधान किसान मानधन योजना प्रमाणेच राज्य पातळीवर मुख्यमंत्री किसान मानधन योजना सुरू करण्याचा विचार विचार आहे फक्त योजना सुरू करताना ती पूर्णत्वाला जायला हवी आणि ती भ्रष्टाचार मुक्त असावी याचाही विचार शिंदे आणि फडणीस सरकार यांना करावा लागणार आहे. अर्थातच फडणवीस यांची प्रतिमा स्वच्छ असल्यामुळे त्यांनी इतरांची मानसिकता बदलायला हवी. शासन- प्रशासन -न्यायव्यवस्था- आणि प्रसार माध्यमे ही लोकशाहीचे चार भक्कम खांब आहेत आणि हे खांब डळमळीत होत असल्याचा आरोप सतत होत आहे. हे खांब मजबूत असणे आवश्यक आहे आणि हे **क्रमशः**

# चांगल्या सवयी व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक!

आधुनिक केसरी

मानवी जीवनात व्यक्तीमत्व विकासाला खुप महत्व आहे.माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासाची जडणघडण ही चांगल्या सवयीतुनच होत असते. रोज सकाळी पहाटे लवकर उठण्याची सवय ही आपल्याला आयुष्यभर उपयोगी पडणारी आहे. आपली जीवनशैली बदलण्यासाठी पहाटे लवकर उठण्याची सवय लावुन घेणे गरजेचे आहे. जीवनशैली अशी असली पाहिजे.की दिवसभराच्या वेळात जास्तीत जास्त कामे आपल्याला करता येतील. रोज सकाळी १ते २ग्लास कोमट पाणी प्यावे. योगासने, ध्यानधारणा,व्यायामाची सवय लावुन घेणे फार गरजेचे आहे.आज माणुस आळशी बनत चालला आहे. व्यायामाअभावी आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यासाठी व्यायामाची सवय लावुन घेणे व्यक्तिमत्त्व विकासासाठी कधीही चांगलेच आहे. नकारात्मक सवयींचा त्याग करून आपल्या सर्वांगीण विकासासाठी चांगल्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत. त्याचबरोबर गुरुजनांचा,व वडीलधाऱ्या मंडळींचा मानसन्मान राखला पाहिजे.त्यांच्याशी आदराने बोलले पाहिजे. मनातील बुरसटलेले विचार काढून टाकणे गरजेचे आहे.याचबरोबर स्वताःचा सर्वांगीन विकासावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे.व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीत पोशाखाला देखिल महत्व दिले पाहीजेत.कपडे निवडीबद्दल नेहमी जागरूक रहा. आपल्याला शोभून दिसतील असेच कपडे निवडा. आपण जर व्यवस्थित पोशाख करून बाहेर समाजात वावरलो तर आजुबाजुच्या सगळ्याच लोकांना प्रसन्न वाटते. ज्यावेळेस लोक भेटतात तेव्हा आपल्यात आत्मविश्वास निर्माण होतो. त्यासाठी चांगले कपडे परीधान करण्याची सवय लावावी. आपल्यातील चांगल्या गुणांकडे पहावे. चांगल्या सवयी अंगी बाणवून त्या वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.तुम्ही तुमचे भविष्य बदलू शकत नाही.पण सवयी बदलू शकता.असं भारताचे राष्ट्रपती डॉ.ए.पि.जे.अब्दुल कलाम यांनी सांगितलेले आहे व्यक्तिमत्त्व विकासासाठी बोलण्याची सवय लावून घेतली पाहिजे.तुम्ही जेवढे जास्त बोलाल.तेवढा तुमचा आत्मविश्वास वाढेल.

व्यसनाच्या नादी लागू नका. निष्कलंक चारीत्र हे सर्वश्रेष्ठ आहे. नवनवीन गोष्टी शिका. वृत्तपत्राचे वाचन करा, मोबाईल फोन, संगणक यांचा आवश्यकतेनुसार वापर करा. पुस्तकांशी मैत्री करून वाचलेले वेचून जीवनात यशस्वी व्हा. या सवयी नक्कीच जीवनात उपयोगी पडणाऱ्या आहेत. सतत आनंदी राहण्याची कला आत्मसात केली पाहिजे.स्वताःला पुर्णपणे समर्पित करून स्वताच्या आवडी निवडी जोपासा ,स्वताःसाठी वेळ काढा. हे जीवन पुन्हा पुन्हा येत नाही. त्यासाठी चांगल्या सवयीतूनच जडणघडण करा.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

# कृषिक्रांतीचे जनक डॉ. पंजाबराव देशमुख



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र. : 7620021396

आधुनिक केसरी

**27 डिसेंबर 1898 साली विदर्भभूमीत एक उत्तुंग उंचीचे दैवी वरदान लाभलेले व्यक्तिमत्व जन्माला आले. त्यांचे नाव महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख होय. समाजाला तारणारे ते एक महान तारक होते. कृषी शिक्षणात वैदर्भीय तरुण उच्च विद्याविभूषित व्हावा ही भाऊसाहेबांची कळकळीची इच्छा होती. भाऊसाहेब एक द्रष्टे महापुरुष होते. देशाच्या खेड्यापाड्यात राहणारा निरक्षर शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असणारा सर्वसाधारण गरीब, खेड्यातील माणूस शेतीवर अवलंबून असणारी ही खेड्यापाड्यातील जनता, शेतीच्या अर्थव्यवस्थेत अतिशय दुबळी व अशिक्षित असल्यामुळे पिळल्या जाणारा हा प्रचंड जनसमुदाय, त्यांचे दुःख दारिद्र्य भाऊसाहेबांकडून कधीही बघितल्या गेले नाही.**

भाऊसाहेबांना भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी होती आणि म्हणूनच शेतकऱ्यांची मुले गोरगरीब खेड्यातील जनता शिकली पाहिजे आणि त्यांनी शिक्षणाची शिदोरी गाठीशी घेऊन सामूहिकरीत्या या व्यक्तीशा शेतीसाठी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगती करू शकला तर दारिद्र्य रेषेखाली असणारी खेड्यातील जनता संपन्नतेकडे, विकासाकडे, खचितच वाटचाल करील असा विशाल भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन भाऊसाहेबांनी प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. नुसताच प्रयत्न करून ते थांबले नाहीत तर शिक्षणाची ज्ञानगंगा गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचविण्याचे पुण्यही आयुष्यभर भाऊसाहेब वाटत राहिले. आयुष्यभर सावकारांच्या कर्जाच्या गर्तेत लोळणारा भारताचा शेतकरी सावकारांच्या कर्जाच्या पाशातून पूर्णतहा मुक्त झाला पाहिजे. तो नुसता कर्जमुक्त होऊन चालणार नाही . ग्रामीण भागात राहणाऱ्या तरुणांसाठी शिक्षणाची नवी दालने उघडी झाली तर शेतीचे नवे तंत्रज्ञान उपयोगात आणून तो अधिकाधिक चांगल्या तऱ्हेने वाटचाल करू शकेल. त्याचे सर्व कुटुंब एका नव्या जिद्दीने उभे राहील हे स्वप्न भाऊसाहेब आयुष्यभर साकार करीत राहिले. या द्रष्ट्या महामानवाचे आमच्या रक्ताच्या थेंबा थेंबात विचार भिंनलेले आहेत. विदर्भातील तरुण पिढी आज जी सुशिक्षित व शिक्षित दिसत आहे त्याचे सर्व श्रेय भाऊसाहेबांना आहे. भाऊसाहेबांनी गोरगरिबानां करिता शिक्षणाची दालने उघडली नसती तर आजचे चित्र आपल्याला दिसले नसते. भाऊसाहेब एवढ्यांवरच थांबले नाहीत. या देशात विकासाचा कणा शेतकरी आहे. विदर्भाचे शेतकरी असंघटित आहेत. अशिक्षित आहे. आणि परंपरागत तंत्राने शेती करीत आहे आणि तो कर्जात पूर्णतः बुडालेला आहे. अशावेळी भाऊसाहेबांनी भारत कृषक समाजाची स्थापना करून सर्व शेतकऱ्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला आणि साकार करूनही दाखविला.

भारत कृषक समाजाची स्थापना ही भाऊसाहेबांच्या अथक परिश्रमातून झाली. ही संघटना आणि त्याद्वारे संबंध देशांमध्ये शेतकऱ्यांना जागृत करण्याची एक ऐतिहासिक कामगिरी त्यांनी केली. भाऊसाहेब तेथेच थांबले नाहीत तर सावकारांच्या कर्जाच्या मगर मिठीतून शेतकऱ्याला सोडविण्यासाठी देश पातळीवर भारत कृषक बँक असावी असा विचार त्यानी मांडला. खेड्यापाड्यातल्या शेतकऱ्याला त्यांच्या गरजांची पूर्तता करता यावी यासाठी प्रयत्न केले.

भाऊसाहेब हे सामान्य जनतेचे आशास्थान होते. ते राजकीय नेते तर होतेच परंतु त्याहीपेक्षा सामाजिक प्रक्रियेला गतिमान करण्याचे कार्य भाऊसाहेबांनी स्वतःच्या जीवनापासून सुरू केले. सर्वधर्मसमभाव ही संकल्पना आज आपण बोलतो परंतु भाऊसाहेबांनी प्रत्यक्ष कृतीत सर्वधर्मसमभाव जोपासला. नाहीतर तो अधिकाधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्न केला. आणि म्हणूनच खऱ्या अर्थाने महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, यांच्या विचारांची मशाल घेऊन आयुष्यभर भाऊसाहेबांनी समाज परिवर्तन ,प्रबोधन घडवून आणण्याचे काम अखंडपणे चालू ठेवले. हजारो तरुणांना भाऊसाहेबांनी एका नव्या विचाराचे शिल्पकार म्हणून घडविले. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख काही काळ राजकारणात होते ते मंत्री म्हणूनच. मध्यवर्ती शासनात भारताचे कृषिमंत्री, सहकार मंत्री इत्यादी पदे त्यांनी भुषविली.

ती केवळ शेतकरी व सामान्याच्या विकासासाठी. भारतातील शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी म्हणून भाऊसाहेबांनी 1956 साली भारत कृषक समाजाची स्थापना केली. त्यांच्या हयातीपर्यंत ते या संस्थेचे अध्यक्ष होते.भारतीय कृषी क्षेत्रात विश्वकृषी प्रदर्शनी ही एक ऐतिहासिक घटना होती. 1959 ते 1960 ला जागतिक शेतकरी प्रदर्शनाचे दिल्लीला आयोजन केले. एक भव्यनगरी त्यांनी राजधानीत उभी केली. गंगापुत्र भगीरथाने गंगोत्री वरून गंगा भारतात आणली. तशी पयोष्णी पुत्र पंजाबरावांनी जागतिक कृषी गंगा दिल्लीस आणली होती. एवढे प्रचंड प्रमाणात हे प्रदर्शन पाहून त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद व पंतप्रधान पंडित नेहरूजी थक्क झाले. आणि कृषी राज्यमंत्री डॉ.भाऊसाहेबांची कार्यक्षमता , प्रतिभा आणि दूरदृष्टी पाहून ते आश्चर्यचकित झाले. योगायोगाने अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर, व रशिया चे अध्यक्ष हे भव्य कृषी प्रदर्शन पाहून भारावून गेले .योगायोगाने या प्रदर्शनात रशिया, अमेरिका, इंग्लंड, डेन्मार्क, इंडोनेशिया आदी देशांचे स्टॉल लावण्यात आले. मंत्रीपदाच्या विशाल व्यापात असतानाही शेतकऱ्यांच्या दुःखाकडे पाठ फिरविणे भाऊसाहेबांना जमले नाही. भारतीय शेतकरी ज्ञानसंपन्न आणि स्वयंपूर्ण व्हावा अशी भाऊसाहेब देशमुख यांची महत्त्वकांक्षा होती. शेतकऱ्यांच्या मुलांनी खूप शिकावे यासाठी ते सतत दिसले .त्यासाठी मंत्रीपद त्यांनी दुय्यम मानले. राजकारणाला गाऊन स्थान दिले. शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या या पंजाबरावाने भारताची कृषी क्षेत्रातील नाडी ओळखली. भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात



कृषिमंत्री पदाची सूत्रे हाती घेताच भारतातील शेती सुधारण्यासाठी डॉ. भाऊसाहेबांनी आपली सारी शक्ती पणाला लावली. साऱ्या भारतातील कृषी क्षेत्रात अमलाग्र क्रांती घडविण्यासाठी त्यांनी जे परिश्रम घेतले त्यांची फल निष्पत्ती म्हणून कालांतराने आज भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे .त्या पंजाब प्रांतात नैसर्गिक सोयी उपेक्षित ठरल्या होत्या. त्या सर्वांचा सदुपयोग करून राष्ट्राला भरभराटीचे व वैभव संपन्न दिवस आणण्यासाठी डॉ. पंजाबराव यांनी विज्ञानाची कास धरली. डॉ. पंजाबराव देशमुख म्हणजे कृषकांचे आशास्थान. कृषकांच्या उद्धारासाठी त्यांनी भारत कृषक समाज स्थापन केला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या दहापट व्याप व आठ कार्यालय असलेल्या विविध कृषी विषयक संस्था दिल्ली येथे निर्माण केल्या गेल्या. डॉ. भाऊसाहेबांनी कृषकांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले जीवन सर्वस्व वेचलेले आहे. भारतीय कृषकांसाठी केलेल्या अनमोल, अजोट व सर्वात्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने अमेरिकेतील राष्ट्रीय कृषी संघटनेचे 1962 मध्ये आपल्या संस्थेचे माजी सदस्यत्व बहाल करून सन्मानित करण्यात आले.

किंबहुना डेन्व्हर कोलोरॅडो येथील संस्थेच्या मुख्यालयात एका पितळी पट्टीवर डॉ. भाऊसाहेबांचे नाव अंकित करून दुर्लभ बहुमान प्रधान केला. या भारतीयाला प्राप्त झालेला हा दुर्लभ बहुमान असाधारण स्वरूपाचा होता. भाऊसाहेबांचे कृषी तथा शिक्षण विषयक कार्य सर्वश्रुत आहे. विद्यार्थ्यांनाही ते देशकार्यासंबंधी धडे देत असत. कधी तज्ञांना बोलावून त्यांच्या भाषणातून , तर कधी स्वतःच्या भाषणांमधून देश समृद्ध व्हावा हा एकच ध्यास त्यांच्या प्रत्येक शब्दागणिक व्यक्त होई.

चीन दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.चीनची प्रगती दाखविणारी काही छायाचित्रे त्यांनी सोबत आणली होती. एका छायाचित्रांमध्ये धानाच्या पिकावर पाटी ठेवून तीन-चार लहान मुले उभी राहतात असे दाखविले होते. अशा प्रकारे कमी जागेत जास्त दाट पिके व सशक्त पिके आपल्याला भारतामध्ये घ्यायला हवी . या बाबतही भाऊसाहेबांची देशाबाबतची आंतरिक तळमळ होती .जुन्या काळात शेतकऱ्यांकरिता कर्जलवाद कायदा करून त्यांनी कितीतरी शेतकऱ्यांची शेतजमीन सावकारी पाशातून वाचविली. ग्रामीण जनता व शेतकरी यांच्या प्रति त्यांच्या मनात असीम जिव्हाळा होता. महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाब प्रांतातील शेतकऱ्यांमध्ये सुद्धा भाऊसाहेबांविषयी अत्यंत आदर व अभिमान होता . पुढे भाऊसाहेबांनी भारत कृषक समाजाच्या विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संस्था निर्माण केली. कृषक सहकारी भारतीय अधिकोष स्थापन केला. भारताबाहेरच्या देशांच्या दृष्टीने आफ्रिका, आशिया ग्रामीण पुनर्रचना संघटना सुरू केली. पुढे त्यांनी अखिल भारतीय कृषी सहाय्यक संघटना, अखिल भारतीय मधमाशी पालन संघटना, अखिल भारतीय ताडगुळ महासंघ, कृषी उत्पादकांचा आंतरराष्ट्रीय संघ अशा अनेक संस्था निर्माण केल्या. भाऊसाहेबांनी आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण गोरगरिबांच्या , शेतकऱ्यांच्या उत्कर्षाकरिता व सेवेकरीता वेचला.

# 40 % पाणी वाया ? नुकसान कुणाचं ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**पाऊस काळ मुबलक झाला की, धरणं भरतात आणि धरण भरले की शेतीसाठी पाणी मिळते. एक काळ असा होता एकदा धरण भरलं की तीन वर्षे पाणी पुरायचं. आज परिस्थिती तशी नाही. धरण भरलं की त्याच वर्षी 100 टक्के खाली होतं. अर्थात याची तांत्रिक कारणं वेगळी आहेत. वाहुन येणारा गाळ त्यामुळे धरणात साचलेला गाळ ज्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी होणे पण दुसर्‍या बाजुने एक विचार करणे निश्चित महत्वाचं आहे.**

बाहेरचं उदाहरण सोडा पण बीड जिल्ह्यात माजलगाव, मांजरा या धरणातून शेतकर्‍यांच्या शेतीसाठी काढण्यात आलेले कालवे याची परिस्थिती जर खर्‍या अर्थाने जवळ जावुन पाहिल्यानंतर सरकार वेडं का व्यवस्था वेडी ?हाच प्रश्न पडतो. शेतीसाठी जेव्हा कालव्यातुन पाणी सोडल्या जाते त्या एकुण पाण्यापैकी केवळ चाळीस टक्के पाणी शेतकर्‍यांच्या पदरात पडतं. 50 ते 60 टक्के पाणी वाहुन जातं. ज्याचा फायदा शेतकर्‍यांनासुद्धा होत नाही आणि हे सगळं टाळण्यासाठी खर्‍या अर्थाने आता कालव्यामध्ये बंद पाईपलाईन टाकुन शेतकर्‍यांना पाणी देण्याची व्यवस्था करण्याची गरज आहे. माजलगाव किंवा मांजरा तत्कालीन काळात तांत्रिक अभ्यासगटानुसार धरणाची निर्मिती झाली. जुना काळ त्यावेळी अत्याधुनिक साधन सामुग्रीचा अभाव असायचा. सिंचन व्यवस्था ही पाटकरी किंवा अशा कालव्याद्वारे असायच्या. उदा. माजलगाव धरणातुन दोन कालवे शेतकऱ्यांच्या शेतीत पाणी जातं. त्यापैकी ढोरगाव शिवारातून सुरूवातीला सुटणारा कालवा सोनपेठ-गंगाखेड थर्मलपर्यंत पोहोचतो. 21 दिवसाला जेव्हा पाणी शेतीला सोडल्या जातं तेव्हा या कालव्यातील जवळपास 40 टक्के पाणी शेतकर्‍यांना मिळतं. उर्वरीत 50 ते 60 टक्के पाणी कालवे ठिकठिकाणी फुटले असल्याने त्याची दुरूस्ती केवळ कागदोपत्री आणि पैसे काढले जातात पण प्रत्यक्षात कधीच होत नसल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी वाहुन जाते. अगदी भर उन्हाळ्यात नदी नाले पावसाळ्याप्रमाणे वाहतात. परिणाम काय होतो एक तर शेतीला एवढं पाणी मिळतं की शेतकर्‍यांच्या शेती अक्षरशः वाहुन पण जातात. दुसरी गोष्ट तळं जसं यंदा शंभर टक्के भरलं तसंच याच वर्षी ते खाली होतं. कारण कालव्यावाटे सोडलं जाणारं पाणी ज्याची उद्देशापेक्षा विल्हेवाट जास्त लागली जाते.

पण हा विचार सिंचन पातळीवर कुणीतरी कुठेतरी करायला हवा. एकीकडे आपण थेंब थेंब पाण्यासाठी झगडतो पाणी बचतीच्या चळवळी राबवतो आणि जेव्हा दुष्काळ चक्र फिरतं तेव्हा पाण्याचं महत्व लक्षात येतं. गुजरातसारख्या राज्यात दुष्काळावर मात करताना सद्याचे पंतप्रधान आणि तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनव योजना शेतकर्‍यांच्यासाठी हाती घेतली. कच्छसारख्या भागात शेतकर्‍यांना बंद नळावाटे पाणी देण्यात आलं. उदा.प्रत्येक दारावर नळाची तुट्टी फिरूनच पाणी ज्यातुन पाणी बचत झाली आणि शेतकर्‍यांच्या जीवनात आर्थिक क्रांती त्या ठिकाणी उभा राहिली. स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी 2009 साली खासदार झाल्यानंतर अशा प्रकारची मागणी बंद नळावाटे पाणी देण्याची केली होती. त्याचे फायदे निश्चित जास्त आहेत. कुंडलिका नदीवर सोन्नाखोटा येथे जो प्रकल्प झाला त्या प्रकल्पाच्या सिंचन कालव्यातुन पाईपलाईनद्वारे पाणी अभिनव योजना राबवण्यात आलेली आहे. खरं म्हणजे हेच मॉडेल जुन्या कालव्यासाठी राज्य सरकारच्या पाटबंधारे खात्याने प्रयोग म्हणुन हाती घ्यायला हवे. त्या व्यवस्थेमुळे पाण्याचा एक थेंबही वाया जात नाही. जलसंपदा विभाग अर्थात मंत्री जयंतराव पाटलांनी हा प्रयोग खर्‍या अर्थाने हाती घ्यायला हवा. बीड जिल्ह्यातील सर्वच पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी आणि सद्या सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधींनी काळाची गरज म्हणुन ही मागणी लावुन धरायला हवी. उदाहरणादाखल सांगायचं झालं तर माजलगावच्या एका कालव्यात बंद पाईपलाईन टाकली आणि त्याद्वारे चारीचीही रचना तशीच करून शेतकर्‍यांच्या बांधावर पाणी सोडलं तर बघा एक तर पाण्याची बचत मोठ्या प्रमाणावर होईल. दुसरी गोष्ट त्याची उपयुक्तता वाढेल



आणि उपलब्ध पाण्याचा फायदा जास्तीत जास्त शेतकर्‍यांना घेता येईल. आज पाणी रोटेशन हिवाळा, उन्हाळा लक्षात घेता 5 ते 6 एवढेच होतात पण बंद पाईपलाईनद्वारे जर व्यवस्था पाणी सोडण्याची झाली तर मग नाही म्हटलं तर दहा दिवसाला पाणी सोडलं त्यावर शेतकर्‍यांचं पोट निश्चित भागु शकेल. पण हा सारासार विचार निश्चित करायला हवा. आमदारांनी अशा प्रकारची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करायला हवी. जलसंपदा मंत्र्यांनी यावर विशेष लक्ष द्यायला हवं आणि यांना वेळ नाही मिळाला तर जिल्हाधिकार्‍यांनी स्वतः तशा प्रकारचा आराखडा पाटबंधारे खात्याच्या अधिकार्‍यांना सुचना देवुन बनवला तर एक आगळावेगळा प्रयोग बीड जिल्ह्यात जुन्याच धरणामध्ये निश्चित होवु शकतो ज्याचा सर्वाधिक फायदा शेतकर्‍यांनाही मिळेल आणि याच बंद नळावाटे पाण्यावाचुन तळमळणार्‍या गावाला पिण्याचं पाणीसुद्धा उपलब्ध होवु शकेल. म्हणुन सद्याच्या कालव्यात पाईपलाईन टाकुन पाणी वाहुन नेण्याची तात्काळ गरज आहे. आहे त्या कालव्यात जेव्हा पाणी सोडल्या जाते तेव्हा खर्‍या अर्थाने जर फेरफटका मारला तर एकुण पाण्यापैकी नुकसानीत जाणारं पाणी किती ?याचा हिशोब लक्षात येतो. मग लोकप्रतिनिधीचे डोळेसुद्धा उघडल्याशिवाय राहणार नाहीत. अनेक प्रश्न यामुळे सुटतील आणि शेतकर्‍यांना त्याची फार मोठी मदतही होईल. सर्वाधिक वीज नाही म्हणुन मोठ्या प्रमाणावर पिकाचं नुकसान होतं त्यासाठी बंद नळावाटे पाण्याची योजना राबवली तर वीज बचतसुद्धा मागणी कमी होईल. ज्यामुळे शेतकरी अडचणीत येणार नाही. सरकारने हा निश्चित विचार करण्याची गरज आहे. अलीकडे पाऊस चांगला पडत असला तरी पाण्याची बचत करणे आता काळाची गरज झाली आहे धरणाच्या कालव्याची दुरुस्ती करण्यासाठी सरकारकडे निधी उपलब्ध नाही किंवा ओबडधोबड केली जाते त्यापेक्षा पाईपलाईन टाकून शेतकऱ्यांच्या दारावर पाणी जर गेले तर पाण्याचा अपव्य होणार नाही शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि भरलेला धरण किमान तीन वर्ष पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध राहू शकेल हे मात्र नक्की.

# योग्य आहार देईल थायरॉईडपासून सुटका

आधुनिक केसरी

आजकाल वजन वाढायला लागले की, डॉक्टर थायरॉईडची तपासणी करण्याचा सल्ला देतात. हो. कारण अचानक वाढणाऱ्या वजनाच्या मुळाशी थायरॉईड असू शकते. बिघडलेल्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते. पण घाबरु नका योग्य आहार तुमचे या आजारापासून रक्षण करु शकतो. बरं हे थायरॉईड प्रकरण नेमकं काय आहे. थायरॉईड ही एक लहान ग्रंथी असून तिचा आकार एका फुलपाखरासारखा असतो आणि ती गळ्याच्या खालच्या भागात स्थित असते. तिचं मुख्य कार्य म्हणजे शरीराच्या चयापचय क्रियेचं नियंत्रण ठेवणे असते. थायरॉईड आहे हे कसे ओळखावे. साधारणपणे थायरॉईडची लक्षणे पुढीलप्रमाणे दिसतात. बद्धकोष्ठता (संडासला साफ होत नाही.), शरीराचं वजन अचानक कमी जास्त होत राहते, हात पाय थंड पडतात, त्वचा कोरडी पांढरी पडते, ताण तणाव वाटतो, आळशीपणा येतो, शारीरिक आणि मानसिक विकासात अडथळे, केस गळणे. थायरॉइडचे विकार होण्याची कारणे गुंतागुंतीची असू शकतात. परंतु, काही पथ्य पाळल्यास होऊ घातलेले थायरॉइड विकार टाळता येतात. त्यासाठी आहार, व्यायाम आणि वैद्यकीय सल्ला महत्त्वाचा आहे. चौरस आहार हा थायरॉईडला दूर ठेवण्यास महत्त्वाचा ठरतो. आयोडिन, लोह, अ जीवनसत्त्व यांचा समावेश असलेल्या पदार्थांचे सेवन हॉर्मोन्सच्या उत्पादनाला चालना देते. साखर आणि पिष्टमय पदार्थांचे मर्यादित सेवन करावे. या दोन्ही पदार्थांमुळे वजन वाढते. ज्यामुळे थायरॉइडच्या उत्पादनावर आणि अभिसरणावर परिणाम होतो. तेल-तूप-चरबी वाढविणाऱ्या पदार्थांपासून दूर राहिल्याने हृदयविकार, डायबेटिससह हॉर्मोन्सच्या विकारांवर नियंत्रण मिळवता येतो. दररोज ३० मिनिटे व्यायाम केल्याने रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे रक्तातील थायरॉइड शरीराच्या सर्व पेशींपर्यंत पोहोचते.

**हा आजार टाळण्यासाठी काय खावे-**

सफरचंद खाणं हायपोथायरॉयडिज्म समस्येत फायदेशीर मानलं जातं. कारण सफरचंदात फायबर आणि क जीवनसत्वाचं प्रमाण जास्त असतं. बेरी गटातील फळं खावीत. स्ट्रॉबेरी खाण्याचा सल्ला दिला जातो. बेरी आणि स्ट्रॉबेरी फळांमध्ये अँटिऑक्सिड्ण्टसचं प्रमाण भरपूर असतं त्याचा फायदा थायरॉइड ग्रंथीला होतो. संत्री खाव्यात. संत्र्यामध्ये क जीवनसत्व असतं. हायपोथायरॉयडिज्म समस्येत वजन कमी करण्यासाठी संत्री उपयुक्त ठरतात.




# फुलंब्री येथे ख्रिसमस सण उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरामध्ये क्रिसमस सणा निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संदीप खंडागळे व शरोन प्रार्थना ग्रुप यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. राजेंद्र ठोंबरे साहेब माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व शिवसेना तालुका प्रमुख हे होते तसेच मा. सभापती क्रू. उ. बा .समिती चाद्रकांत जाधव वं.ब.आ.महिला तालुका अध्यक्ष सौ.पुष्पाताई मोरेभा.ज.पा.युवा शहराध्यक्ष मा.श्री.वाल्मीक भाऊ जाधव तालुका प्रमुख री.पा.ई.(D)अजय गंगावणे हे प्रमुख पाहुणे होते.लहान लेकरांनी येशूच्या जन्मा विषयी नाटक तसेच डान्स या द्वारे कार्यक्रमात सहभाग घेतला या कार्यक्रमासाठी पा.विलास नवगिरे यांनी मार्गदर्शन केले तसेच येशु ख्रिस्ताने जगात शांती,बंधुता,प्रीती,या विषयी लोकांना शिकवले रेव्ह.शिवाजी भालेराव यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले.पा.नवनीत कांबळे पा.निलेश घोरपडे पा.अशोक आहिरे पा.रितेश कांबळे ब्र.अनिल सिस्ट.प्रीती एम्मानुएल आराधना ग्रुप पुरी यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले.शहरातील अनेक नागरिकांनी या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

# माजी अपक्ष नगरसेवक खंडणीच्या गुन्ह्यात प्रेयसीसोबत अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** माजी अपक्ष नगरसेवकाला ला सातारा पोलिसांनी त्याच्या प्रेयसी सहित अन्य दोघांना खण्डणीच्या गुन्ह्यात अटक केली आहे. संजय पंडित जाधव व मंजुश्री बोर्डे, प्रतीक जाधव व नाकीब पटेल अशी अटक आरोपीची नावे आहेत. संजय जाधव व मंजुश्री बोर्डे हे दोघे बंजारा कॉलनीत राहतात. मंजुश्री ही रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे तिने यापूर्वीही क्रांतीचौक पोलीस ठाण्यात एका नागरिकाविरुद्ध विनयभंगाची खोटी तक्रार दिली होती, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. गेल्या २९ सप्टेंबरपासून हा प्रकार सुरु आहे फिर्यादीचा मित्र सुदर्शन मुटकुळे हा आरोपी मंजुश्री पाटील हिच्या घरात किरायाने राहत होता. फिर्यादीचे मित्राकडे येणेजाणे असल्यामुळे मंजूश्री बोर्डे ने त्याला प्रेमाच्या जाळ्यात ओढले व शरीरसंबंध प्रस्थापित केले त्यानंतर फिर्यादीच्या मित्राने ते घर सोडून दिल्यामुळे फिर्यादीने आरोपी मंजुश्री चे फोन घेणे बंद केले म्हणून तिचा प्रियकर संजय जाधव याने व्हॉट्सअपवर ब्लॅक मॅसेज पाठवला व फोन केला तुमचे पार्सल आलेआहे. तुमचा ऑफिस एड्रेस पाठवा म्हणून फिर्यादीने त्यांना रेल्वेस्टेशन परिसरातील कार्यालयासमोर बोलावले व फिर्यादी मोटरसायकलवर ऑफिस समोर आला.त्यावेळी आरोपी संजय जाधव याने आपण क्राइमब्रँच मुंबई, पीआय प्रदीप घुगे अशी ओळख करून दिली व बळजबरी फिर्यादीला आरोपींनी कार मध्ये बसवून बीड बायपास वरील पाटीलवाडा हॉटेल मध्ये नेले.व त्या ठिकाणी मंजुश्री ने तुझ्या विरोधात बलात्काराची फिर्याद दिली आहे. हे प्रकरण मिटवायचे असेल तर १०लाख रु. दे असे धमकावले.त्यांनंतर विवस्त्र करत व्हिडीओ तयार केला. नंतर ४० हजार ३०० रु घेतले दीड हजार रु बिल फिर्यादीला देण्यास भाग पाडले.फिर्यादी १०लाख रु. देऊ शकंत नसल्याचे आरोपीच्या लक्षात आल्यावर आरोपीने ५०हजार रु. मागितले. या प्रकाराला कंटाळून फिर्यादीने सातारा पोलिसाना संपर्क करंत तक्रार दिली. व सातारा पोलिसांनी ५० हजार रु मागत असतानाचसर्व आरोपींना अटक केली वरील कारवाई पोलीस उपायुक्त शिलवंत नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत पोतदार, एपीआय विनायक शेळके, पीएसआय अनिता फसाटे यांनी पार पाडली.

# शेवाळकर यांच्या हिंदी कथेला प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्रातील मराठी आणि हिंदी भाषेचे नामांकित



लेखक नागेश सू. शेवाळकर यांच्या 'यह कैसा बलिदान' या हिंदी कथेला देश पातळीवर घेतलेल्या कथा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. ही कथा स्पर्धा इनोव्हेटिव्ह स्क्रिब्लर्स वर्ड, सहारनपूर उत्तर प्रदेश या संस्थेने आयोजित केली होती. रोख रक्कम, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

नागेश शेवाळकर यांचे हिंदी साहित्यातही उल्लेखनीय कार्य आहे. यापूर्वीही त्यांच्या हिंदी कथांना देशपातळीवर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांची कादंबरी, कथासंग्रह प्रकाशित झाले असून पंधरा प्रातिनिधिक हिंदी कथासंग्रहात त्यांच्या कथा प्रकाशित झाल्या आहेत. याप्रसंगी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शेवाळकर यांनी सांगितले की, 'यह कैसा बलिदान' या हिंदी कथेत ऊसतोड महिला कामगारांच्या व्यथेला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. या वेगळ्या विषयावरील कथेला पुरस्कार मिळाला हा फार मोठा सन्मान आहे. मी संबंधित संस्थेचा अत्यंत आभारी आहे. शेवाळकर यांचे या यशाबद्दल खूप खूप अभिनंदन होत आहे.

# पिरबावडा येथे विहिरीत पडून विवाहितेचा मृत्यू ; पतीविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज


**फुलंब्री :** तालुक्यातील पीरबावडा येथे स्वतःच्या शेतात



कापूस वेचण्यासाठी गेलेल्या महिलेचा विहिरीत मृतदेह आढळल्याने एकच खळबळ माजली होती. महिलेच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून मयतेच्या पतीविरुद्ध वडोदबाजार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिरबावडा तालुका फुलंब्री येथे २७ डिसेंबर २०२२ रोजी कौशल्याबाई दिलीप गाडेकर यावेळी आपल्या गट क्रमांक २४५ पिरबावडा शिवार या शेतात कापूस वेचण्यासाठी गेल्या होत्या. मात्र २७ डिसेंबर रोजी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास माहिती मिळाली की त्यांचा विहिरीत पडून मृत्यू झाला. या घटनेची खबर वडोदबाजार पोलिसांना दिल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. कौशल्याचे प्रेत वर काढून उपजिल्हा रुग्णालय फुलंब्री येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तीस मयत घोषित केले. कौशल्याचा विवाह सोळा वर्षांपूर्वी २००४ मध्ये दिलीप गाडेकर यांच्या सोबत झाला होता. त्यांना दोन आपत्त्य असून मयत महिला कौशल्याबाई दिलीप गाडेकर यांचा भाऊ काकाजी माणिकराव कोलते राहणार टाकळी कोलते ता . फुलंब्री यांच्या फिर्यादीवरून भा.द.वि. 306 323 498 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनी आरती जाधव ह्या पुढील तपास करत आहे.

# पैठण येथे दत्त जयंती संगीत महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** भानुदास एकनाथ प्रतिष्ठान व एकनाथ संगीत विद्यालया तर्फे दि. ३०, ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी संत दत्त जयंती संगीत महोत्सवाचे आयोजन एकनाथ महाराज समाधी मंदिरात करण्यात आले आहे. स्वर शर्मा पं.गिरीश गोसावी, अदिती गोसावी, श्रीकृष्ण गोसावी यांचे गायन व अभिनय रवंदे अशय कुलकर्णी, दिनेश डोळे, शांदुल मंगीराज हे कलाकार हार्मोनियम, तबला व व्हायलीन वादन करत आपली सेवा नाथ चरणी सादर करणार असुन या वर्षी पुरस्कार ही वितरण करण्यात येणार असल्याची माहिती, भानुदास एकनाथ प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली यावेळी अध्यक्ष, श्रीकृष्ण गोसावी, हरिपंडीत गोसावी, शैलेश मंगिराज, मकरंद शहापुरकर, मृणाल गोसावी, संजय डोळे, गौरी गोसावी यांनी दिली.



# अ.भा. ब्राह्मण महासभा दिल्ली यांच्यातर्फे शुगर डायबिटीज आणि रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय जांगिड़ ब्राह्मण महासभा दिल्ली अंतर्गत जिल्हा सभा छत्रपती संभाजीनगर मध्ये महासभेचा 116 वा स्थापना दिवस मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला हा कार्यक्रम जांगिड़ ब्राह्मण सुथार समाज नक्षत्रवाडी छत्रपती संभाजी नगर यांनी आयोजित केला यात फ्री शुगर डायबिटीस आणि रक्तदान हा प्रोग्राम मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आला यावेळी सर्व समाज बांधवांनी मनापासून भाग घेतला आणि कार्यक्रम यशस्वी करण्यात आला यावेळी डॉ आर बी जांगिड़ (शर्मा) (कमलन बजाज हॉस्पिटल /सिग्मा हॉस्पिटल) आणि डॉ गणेश बरनेला किडनी ट्रान्सप्लान्ट (कमलनयन बजाज हॉस्पिटल/ सिग्मा हॉस्पिटल) व रक्तदानचे प्रमुख मनोज चव्हाण यांच्या मुळे कार्यक्रम शांतीपूर्वक पार पडला यावेळेस महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष रोहिताश जांगिड़, मदनलाल जांगिड़, श्यामलाल जांगिड़, जिलाध्यक्ष छोटूलाल जांगिड़, अशोक जांगिड़, भवानी शंकर जांगिड़, महेंद्र लादोया, रामसुख जांगिड़, रमेश खरनालिया, भंवरलाल थाटा, श्रवण दायमा, सुखदेव जांगिड़, रामजीलाल जांगिड़ राधेश्याम जांगिड़, ज्योतिषाचार्य प्रकाश जांगिड़ धर्मेंद्र जांगिड़, सुनील जांगिड़, संजय जांगिड़, मनीष जांगिड़ हे समाज बंधू उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in